सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

कोलकात्यात चेंगराचेंगरी; 19 जणांचा मृत्यू, 25 जखमी

कोलकत्ता : पश्चिम बंगालमधील उत्तर कोलकाता येथील चोरबागान सार्वजनिक दुर्गापूजा मंडपात शनिवारी रात्री चेंगराचेंगरीची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत 19 जणांचा मृत्यू झाला असून 25 जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

जोरदार पावसामुळे गर्दीत गोंधळ

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री जोरदार पाऊस सुरू असताना दुर्गापूजा मंडपात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पावसापासून बचाव करण्यासाठी भाविकांची धावपळ सुरू झाली. त्यातच मंडपात प्रवेश करण्यासाठी गर्दी वाढल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली, असे सांगितले जात आहे.

या दुर्घटनेतील जखमींना तातडीने कोलकाता मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे काही जणांना मृत घोषित करण्यात आले, तर उपचारादरम्यान काहींचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जखमींवर उपचार सुरू असून एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

या घटनेनंतर राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आल्याचे वृत्त आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी 25 लाख रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याबाबतही घोषणा झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्च सरकारकडून केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

दुर्घटनेच्या चौकशीची मागणी

या चेंगराचेंगरीच्या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. गर्दी नियंत्रणासाठी केलेली व्यवस्था, मंडपातील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता यांची तपासणी होण्याची शक्यता आहे. आयोजक आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित व्यक्तींची पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याचे वृत्त आहे.

पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याचे वृत्त आहे. इतर राजकीय नेत्यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त करत पीडित कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

मध्य प्रदेशात मंदिराजवळ भीषण अपघात; ट्रकच्या धडकेत 12 जणांचा मृत्यू, अनेक जखमी

ग्वाल्हेर : मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे शीतला माता मंदिराजवळ शनिवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला. भाविकांच्या गर्दीत भरधाव ट्रक घुसल्याने 12 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या अपघातात मंदिराचे प्रवेशद्वार आणि बाहेरील भिंतीचेही नुकसान झाले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला.

पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून ट्रक भाविकांच्या गर्दीत घुसला

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी पहाटे सुमारे 1.30 वाजण्याच्या सुमारास घडला. छिनोरच्या दिशेने येणारा धान्याने भरलेला ट्रक तीव्र उतारावरून खाली येत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अवजड वाहनांना प्रवेशबंदी असलेल्या या रस्त्यावर पोलिसांचे बॅरिकेड्स लावण्यात आले होते. मात्र, ट्रकने हे अडथळे तोडून पुढे जात रस्त्यावरील भाविकांना धडक दिली. त्यानंतर ट्रक मंदिराच्या प्रवेशद्वाराला आणि बाहेरील भिंतीला जाऊन धडकला.ग्वाल्हेरचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक धर्मवीर सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेनंतर 39 जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी 12 जणांचा मृत्यू झाला असून काही जखमींची प्रकृती गंभीर आहे. अपघातात कर्तव्यावर असलेले दोन पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी. लिट. प्रदान

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सावंगी मेघे (वर्धा) येथील अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (एआयएचईआर) या अभिमत विद्यापीठाच्या १७ व्या दीक्षान्त समारंभात मानद डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली. या सोहळ्यात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनाही वैद्यकीय शिक्षण, आरोग्य व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एस्सी.) पदवीने गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या नावात बदल झाल्यानंतरचा हा पहिलाच दीक्षान्त समारंभ होता.

या समारंभाला मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एआयएचईआरच्या कुलपती आणि अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी अध्यक्षस्थानी होत्या. राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांचीही विशेष उपस्थिती होती. यापूर्वी दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचे नामकरण एआयएचईआर असे करण्यात आले आहे. दीक्षान्त समारंभात १० विद्याशाखांमधील एकूण २ हजार ३२० विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. वैद्यकीय, दंतवैद्यक, आयुर्वेद, फिजिओथेरपी, नर्सिंग आणि अभियांत्रिकी यांसह विविध शाखांतील विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होता.

भरधाव कारची पोलिसांसह भाविकांना जोरदार धडक; पोलीस उपनिरीक्षकांचा जागीच मृत्यू

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंगगडाच्या पायथ्याशी असलेल्या नांदुरी येथे रविवारी, 18 ऑक्टोबर रोजी मध्यरात्री भीषण अपघात घडला. भरधाव कारने रस्त्यावरून जाणाऱ्या भाविकांना आणि बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलिसांना धडक दिल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत वाहतूक शाखेतील एका पोलीस उपनिरीक्षकांचा मृत्यू झाला असून 11 हून अधिक भाविक आणि पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.

भरधाव कारची भाविकांना धडक

मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरी येथील मुख्य रस्त्यावर रात्री सुमारे 2 वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सप्तश्रृंगगडाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची या परिसरात वर्दळ होती. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेल्या कारने भाविक आणि बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांना धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की कारच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात वाहतूक शाखेतील पोलीस उपनिरीक्षकांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांच्या मृत्यूमुळे पोलीस

दलात हळहळ व्यक्त होत आहे.

अपघातानंतर कारचालक फरार : अपघात घडल्यानंतर कारचालक घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. या घटनेमुळे नांदुरी परिसरात खळबळ उडाली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

जखमींवर वणी ग्रामीण रुग्णालयात उपचार

अपघातातील जखमी भाविक आणि पोलीस कर्मचाऱ्यांना तातडीने वणी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे.

फरार कारचालकाचा शोध सुरू : घटनेची माहिती मिळताच कळवण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून फरार कारचालकाचा शोध सुरू आहे. अपघात नेमका कसा घडला, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

कासार समाजाच्या वतीने आ. भुमरे यांची भेट

तभा वृत्तसेवा पैठण दि १८:-
पैठण तालुका कासार समाजाच्या वतीने एका भव्य कालिका देवीच्या मंदिराची उभारणी केली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी धार्मिक व सामाजिक प्रकल्पासाठी पैठणचे लोकप्रिय आमदार विलास भुमरे यांनी समाजाला सर्वतोपरी मदत करण्याचे भक्कम आश्वासन दिल्याची माहिती नगरसेवक सुनील रासने यांनी दिली.

पैठण शहरात कासार समाज मोठ्या संख्येने स्थिरावलेला असून, सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये समाज नेहमीच अग्रेसर असतो.

समाजाच्या वतीने मंदिराच्या उभारणीसाठी स्वतंत्र जागेची खरेदी करण्यात आली असून, आता प्रत्यक्ष मंदिर निर्माणाच्या कामाला गती दिली जात आहे.

मंदिर प्रकल्पाची रूपरेषा व माहिती देण्यासाठी कासार समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि नागरिकांनी आमदार विलास भुमरे यांची सदिच्छा भेट घेतली.

बैठकीदरम्यान औरंगाबाद जिल्हा दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, नगराध्यक्ष भुषण कावसानकर, नगरसेवक सुनिल रासणे,शेखर शिंदे, गटनेते ईश्वर दगडे, नगरसेवक गणेश वरकड यांची उपस्थिती होती.

समाजबांधवांनी मंदिराच्या नियोजनाची माहिती दिली, ज्याला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार भुमरे यांनी मंदिर उभारणीसाठी सर्वतोपरी सहकार्य आणि मदत करण्याचे आश्वासन दिले.

मंदिर उभारणीमुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण

पैठण हे धार्मिक व ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात कासार समाजाच्या वतीने देवी कालिका माता मंदिराची स्थापना होणार असल्याने परिसरातील समाजबांधवांसह भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. लवकरच या मंदिराच्या भूमिपूजन व निर्माण कार्याचा शुभारंभ केला जाणार असल्याची माहिती समाजबांधवांनी दिली आहे.यावेळी महेश रासने . ऋषी तांबटकर.राजू अंदुरे. ऋषिकेश रासने. नंदकुमार रासने प्रमोद रासने. येण्डे गुरुजी . किशोर रासने . विकी दहिभाते. निलेश पानपट . ऋषी दहिभाते . गणेश अंदुरे . भारत दगडे. विश्वेश रासने आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

रिलायन्स, ब्लिंकिट आणि झोमॅटोला FDA चा दणका, संचालकांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

मुंबई: अन्न- औषध प्रशासनाने मुदत संपलेले, खराब झालेले आणि विक्रीसाठी नाकारलेले खाद्यपदार्थांची अफरातफर करून विक्री केली जात असल्याच्या संशयावरून तब्बल 48 लाख रुपये किंमतीच्या खाद्यपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या एका संचालकासह अन्य नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शिवाय, ब्लिंकिट, झोमॅटो या एजन्सीवरही अन्न- औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उचला आहे.

ठाण्यातील शांती नगर पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या एफआयआरमध्ये, रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स, रिलायन्स रिटेल, ब्लिंकइट आणि झोमॅटो हायपरप्युअरचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी, तसेच डिस्पोजल एजन्सी ऑपरेटर्स आणि स्थानिक पुरवठादार यांच्यासह 10 आरोपींची नावे आहेत. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, 2006 आणि भारतीय दंड संहिता, 2023 च्या संबंधित कलमांनुसार एफआयआर नोंदवण्यात आला आहे. एफआयआरमध्ये ज्यांची नावे आहेत त्यात व्ही. सुब्रमण्यम, संचालक, रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड- अशोक कुमार सिंग, रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड- विजय भिकाजी खरमाले, नॉमिनी, रिलायन्स रिटेल लिमिटेड आणि निलेश रामदासराव देशमुख, वेअरहाऊस मॅनेजर, रिलायन्स रिटेल लिमिटेड यांचा समावेश आहे. एफडीएच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 14 ऑक्टोबर आणि 15 ऑक्टोबर दरम्यान ठाणे आणि पुणे जिल्ह्यांतील अनेक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले होते.

अधिकाऱ्यांनी मुदत संपलेले, खराब झालेले आणि विक्रीसाठी नाकारलेले खाद्यपदार्थांची यादी करून तो जप्त केला, नमुने गोळा केले, जबाब नोंदवले.

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

पुणे: पुण्यातील रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल हत्या प्रकरणात ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुलाच्या हत्येप्रकरणी निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केल्यानंतर संबंधित विभागाला आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 18 जून रोजी केतन अग्रवाल (26) याचा लोहगड किल्ल्यावर मृत्यू झाला होता. या प्रकरणात त्याची मंगेतर सिया गोयल (19), तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी आणि चेतनचा मित्र रितेश संजय हांगे यांच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. केतनला किल्ल्यावरून ढकलून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. सुरुवातीला ही घटना अपघात असल्याचे भासवण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे.

पुणे ग्रामीण पोलिसांनी तपास पूर्ण करून वडगाव मावळ न्यायालयात 5,053 पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रात डिजिटल पुरावे, तांत्रिक विश्लेषण अहवाल आणि 100 हून अधिक साक्षीदारांच्या जबाबांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणात सरकारी पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी उज्ज्वल निकम यांच्यावर असेल. त्यांच्या नियुक्तीमुळे खटल्यातील पुढील कायदेशीर घडामोडींकडे लक्ष लागले आहे. आरोपपत्रानुसार, सिया आणि चेतन यांनी लोहगड किल्ल्यावरून पडून झालेल्या अन्य एका महिलेच्या मृत्यूच्या घटनेबाबत इंटरनेटवर माहिती शोधली होती. तसेच देशभरात चर्चेत आलेल्या सोनम रघुवंशी हत्याप्रकरणाची माहितीही त्यांनी मिळवल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. गुन्ह्यांशी संबंधित माहिती आणि हत्येवर आधारित चित्रपट पाहिल्याचाही उल्लेख आरोपपत्रात असल्याचे सांगण्यात आले आहे.

सरस्वती महोत्सवात तीन मान्यवरांचा पुरस्काराने गौरव

तभा वृत्तसेवा
छत्रपती संभाजीनगर : प्रज्ञावंत आबासाहेब पाटील स्मृती विश्वामित्र सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित सरस्वती महोत्सव उत्साहात संपन्न झाला. साहित्य, वाचनसंस्कृती आणि ग्रंथसेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तीन मान्यवरांना यावेळी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प.पू. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर आणि ॲड. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने आयोजित या महोत्सवातून ग्रंथांचे महत्त्व आणि ज्ञानसेवेचा वारसा अधोरेखित करण्यात आला.

शिवराम प्रतिष्ठान, न्यू समर्थनगर येथे झालेल्या महोत्सवात सरस्वती पूजन, गानसेवा आणि बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्राजक्ता सुदामे, सोनिया कुलकर्णी, सोनम भाले आणि मुक्ता तळेकर यांनी गानसेवा सादर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन कला मंडळाचे कार्याध्यक्ष आनंद मुठाळ होते. पूर्णवाद वर्धिष्णू प.पू. डॉ. श्री विष्णू महाराज पारनेरकर यांची उपस्थिती लाभली, तर उद्योजक डॉ. नवरतनमल जैन प्रमुख अतिथी होते.

एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या औषधशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक आणि एमसीआरआय अतिदक्षता विभागाचे संचालक डॉ. आनंद निकाळजे यांना 'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथमित्र पुरस्कार' प्रदान करण्यात आला. लेखक, कादंबरीकार आणि साकेत प्रकाशनचे प्रकाशक बाबाजी भांड यांना 'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथोपजीवी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय, जवाहर कॉलनीचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ कोंडीरामजी जाधव यांना 'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथालय भूषण सेवाव्रती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

यावेळी डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या साहित्याची आजच्या काळातील उपयुक्तता विशद करण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही पूर्णवाद परिवाराकडून अशा उपक्रमांसाठी एकत्रितपणे काम केले जात असल्याबद्दल डॉ. निकाळजे यांनी समाधान व्यक्त केले. बाबाजी भांड यांनी सामान्य विद्यार्थी ते लेखक आणि प्रकाशक होण्यापर्यंतचा प्रवास उलगडला. काशिनाथ जाधव यांच्या वतीने त्यांचे पुत्र सुबोध जाधव यांनी ग्रंथसेवेतील सहकाऱ्यांचे आभार मानले.

आनंद मुठाळ यांनी ग्रंथ ज्ञान देतात; मात्र त्यातील विचारांचा जीवनात उपयोग करण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल दाशरथे यांनी केले. रश्मी कुलकर्णी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. सौरभ मालखरे यांनी सूत्रसंचालन केले, तर पराग जोशी यांनी रामकवी रचित अभंग आणि काव्यगायन सादर केले. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी वाचनालय समितीने प्रयत्न केले.

पाण्याचा ताळेबंद मांडणारे हिवरे बाजार देशात पहिले; धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप; देशात सलग 22 व्या वर्षी पाण्याचा ताळेबंद सादर

नगर (प्रतिनिधी) : आदर्श गाव हिवरे बाजार येथे नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त मुंबादेवी मंदिरात झालेल्या ग्रामसभेत सन 2026-27 चा पाण्याचा ताळेबंद सादर करण्यात आला. नवरात्रोत्सवात पाण्याचा ताळेबंद मांडण्याची परंपरा गावाने सलग 22 व्या वर्षीही कायम ठेवली. यावेळी बोलताना अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांनी, पावसाचा हिशेब मांडून त्यानुसार पाण्याचे नियोजन करणारे हिवरे बाजार हे देशातील पहिले गाव असल्याचे प्रतिपादन केले.(HIWARE BAZAR)

या ग्रामसभेला आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे आयुक्त रवींद्र खेबुडकर, उपसंचालक ऋषिराज गोसकी, तहसीलदार मिलिंद कुलथे, सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, नायब तहसीलदार अभिजित वांढेकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक सोहम साळुखे ,विस्तार अधिकारी चंद्रकांत खाडे, ॲड. विक्रम वाडेकर आदी उपस्थित होते.

पद्मश्री पवार यांनी गावाच्या पाणी स्थितीची माहिती देताना सांगितले की, नवरात्री उत्सव अनादीकाळापासून असून त्यात पाण्याची गुणवत्ता, बियाण्याची उगवणक्षमता व 9 माळी म्हणजे परागीकरण म्हणून नवरात्री उत्सव हा मानवी भवितव्याची पाणी व आरोग्य सुरक्षितेची परंपरा आहेत त्याला फक्त भक्ती व पूजेचे स्वरूप दिले आहे .हिवरे बाजारने नवरात्र भक्तीला कृषीची जोड दिली त्यामुळेच हिवरे बाजार पर्यावरणसंतुलित दारिद्र्यमुक्त गाव झाले आहे. सन 1995 पासून हिवरे बाजारमध्ये पाण्याच्या ताळेबंदाच्या आधारे पीकपद्धतीचे नियोजन केले जात आहे. गावात एकूण 439 विहिरी असून, त्यापैकी 430 विहिरींना सध्या पाणी आहे, तर नऊ विहिरी कोरड्या पडल्या आहेत. गावातील सहा हातपंपांपैकी एका हातपंपातच सध्या पाणी येत आहे. सार्वजनिक नळपाणीपुरवठ्याच्या विहिरीतही पाणी उपलब्ध असून, प्रत्येक कुटुंबाला दोन दिवसांतून एकदा 500 लिटर पाणी दिले जात आहे.गेल्या 20 वर्षांत नळपाणीपुरवठा योजनेवर दुरुस्तीचा खर्च अवघा 80 हजार असून पाणीयोजना महिला चालवितात.

गावात तीन ठिकाणी पर्जन्यमापक बसविण्यात आले आहेत. गिरिमहाराज मंदिर परिसरात 46.7 मिलिमीटर, चोपाळा येथील गणपती मंदिर परिसरात 22.4 मिलिमीटर, तर निंबाचा मळा येथे 53.6 मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या नोंदींनुसार गावातील सरासरी पर्जन्यमान 40.9 मिलिमीटर आहे. शेजारील चास आणि केडगाव शासकीय मंडळांत अनुक्रमे 51.1 आणि 56.1 मिलिमीटर पाऊस नोंदविण्यात आला आहे. हिवरे बाजारच्या इतिहासातील हे सर्वांत कमी पर्जन्यमान असल्याचे नमूद करत पवार म्हणाले की, उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन केल्यामुळे जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत गावाला बाहेरून पाणी आणण्याची गरज भासणार नाही, असा अंदाज आहे. भूजलाचा अनियंत्रित उपसा करून आर्थिक समृद्धी मिळविण्याचा हव्यास कमी केला आणि सामाजिक शिस्त पाळली, त्यामुळेच गावाला या संकटाचा सामना करणे शक्य होत आहे.

सन 2026-27 च्या पाण्याच्या ताळेबंदानुसार, चार दिवसांत झालेल्या 40.9 मिलिमीटर पावसातून गावाच्या शिवारात सुमारे 39.95 कोटी लिटर पाणी उपलब्ध झाल्याची नोंद आहे. त्यापैकी गावाच्या वापरासाठी 27.05 कोटी लिटर पाणी उपलब्ध असल्याचे सादरीकरणात नमूद करण्यात आले. गावाच्या विविध गरजांसाठी वार्षिक 35.23 कोटी लिटर पाण्याची आवश्यकता असल्याने उपलब्धता आणि गरज यामध्ये तूट निर्माण झाली आहे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे आणि पिकांचे नियोजन उपलब्ध पाण्यानुसार करणे अत्यावश्यक आहे.

पाण्याच्या अंदाजपत्रकात लोकसंख्या आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी 7.71 कोटी लिटर, खरीप पिकांसाठी 27 कोटी लिटर, रब्बी पिकांसाठी 126.5 कोटी लिटर, प्रस्तावित उन्हाळी पिकांसाठी 24 कोटी लिटर, बारमाही पिकांसाठी 21 कोटी लिटर आणि इतर वापरासाठी 0.54 कोटी लिटर पाण्याची गरज नमूद करण्यात आली आहे. तथापि, या उपघटकांची बेरीज आणि एकूण वार्षिक गरजेची नोंद यामध्ये तफावत दिसत असल्याने अंतिम प्रसिद्धीपूर्वी आकडेवारीची पडताळणी आवश्यक आहे. ताळेबंदात भविष्यासाठी 8.17 कोटी लिटर पाण्याची तूट दर्शविण्यात आली असून, मागील वर्षी साठविलेल्या 2.68 कोटी लिटर राखीव भूजलाचा वापर करून पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

या ग्रामसभेला सरपंच विमलताई ठाणगे, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, बाबासाहेब गुंजाळ, सखाराम पादीर सर यांच्यासह ग्रामस्थ, तरुण मंडळ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी - डॉ. कमलकिशोर लड्डा

माजलगाव, (प्रतिनिधी) : मोबाईल आणि मल्टिमीडियाच्या वाढत्या वापरामुळे युवा पिढीमध्ये वाचनाची आवड कमी होत आहे. विद्यार्थ्यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श घेऊन वाचन संस्कृती जोपासावी, असे प्रतिपादन इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले.

सिद्धेश्वर महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहून ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन करावे. वाचन संस्कृती ही जीवनाला योग्य दिशा देणारी अनमोल ठेवा आहे, असे मत प्राचार्य डॉ. देवर्षी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजीव गायकवाड यांनी केले, तर डॉ. रमेश गटकळ यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. गजानन होत्रा, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तुळजापूरला जाणाऱ्या माजलगावच्या भाविकांचा भीषण अपघात; पाच जणांचा मृत्यू

पात्रूडजवळ बस-कारचा भीषण अपघात पिता पुत्राचा समावेश

माजलगाव प्रतिनिधी नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला भीषण अपघात झाला. खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर पात्रूडजवळील शिंदेवाडी फाट्यावर रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बस आणि हुंडाई कार यांच्यात जोरदार धडक झाली.या भीषण अपघातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एका १३ वर्षीय बालकाचाही समावेश आहे.या घटनेमुळे माजलगाव शहरासह परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, बस क्रमांक (एमएच २०-२७४०) आणि हुंडाई कार क्रमांक (एमएच २६-४२१०) यांच्यात हा अपघात झाला. अपघातातील मृत व्यक्ती माजलगाव शहरातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी जात असताना काळाने त्यांच्यावर घाला घातला.या भीषण अपघातात नामदास पिता-पुत्राचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ओमकार महादेव गिरी (वय २५), गजानन महादेव नामदास (वय ३८), माऊली ऊर्फ समर्थ गजानन नामदास (वय १३),सोमनाथ बडे (वय २५) आणि अनिल आचारी (वय ४०, मूळचे राजस्थानचे) यांचा मृत्यू झाला.नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वात देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांचा प्रवास अपघातामुळे कायमचा संपला. या दुर्दैवी घटनेने मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, माजलगाव शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अंबाजोगाई घाटनांदूर रस्त्यावर भीषण अपघात; तरुणाचा मृत्यू

अंबाजोगाई : घाटनांदूर रस्त्यावरील पुस येथील शिवाजी चौकाजवळ भरधाव ॲपे रिक्षाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने २५ वर्षीय तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हा अपघाता दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडला होता, याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील रस्त्यावरून संदीप कोंडबा नवघरे (वय २५, रा. उटी, ता. महागाव, जि. यवतमाळ) हा तरुण आपल्या दुचाकीवरून जात असताना शिवाजी चौकापासून १०० फूट अंतरावर समोरून येणाऱ्या ॲपे रिक्षा (क्र. MH 28 E 8750) च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून दुचाकीला धडक दिली. या धडकेत संदीप नवघरे याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा

जागीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेला प्रदीप नावाचा तरुण किरकोळ जखमी झाला आहे. या प्रकरणी मृताचे वडील कोंडबा चंपत नवघरे (वय ७९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बर्दापूर पोलीस ठाण्यात अपे रिक्षा चालकाविरुद्ध गु.र.नं. २७८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार सूर्यवंशी हे करत आहेत.

परवान्याच्या (मनोरंजनाच्या) नावाखाली चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर धाड

11.08 लाखांच्या मुद्देमालासह 11 जुगारी ताब्यात

बीड (प्रतिनिधी)बीड शहर व जिल्ह्यात पर्वण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित अवैध जुगार अड्ड्यावर गेवराई पोलिसांनी धडक कारवाई करत ११ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत जुगाराचे साहित्य, रोख रक्कम तसेच जुगार खेळण्यासाठी वापरली जाणारी दुचाकी व चारचाकी वाहने असा एकूण ११ लाख ८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १७ ऑक्टोबर रोजी गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथे करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाचेगाव येथील यश क्रीडा सांस्कृतिक मनोरंजन केंद्रामध्ये मनोरंजनाच्या नावाखाली पत्र्याच्या बंदिस्त शेडमध्ये पैशांवर जुगार खेळला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. यावेळी आसाराम चंद्रकांत हातवटे, सिद्धेश्वर रामभाऊ लोणकर, शेख जावेद शेख महमूद, श्रीधर झुंगाराम भोजगुडे, कल्याण गणपत जाधव, जिजा लालसिंग राठोड, बाबुराव मिठुभाऊ हातवटे, दत्ता तुळशीराम लोणकर, विठ्ठल जीवन चवदार, हेमंत हरिभाऊ लोणकर आणि दिनेश बाबासाहेब गावडे या ११ जणांना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार सचिन भोर करीत आहेत.

परवान्याच्या नावाखालील जुगारावर नियंत्रण कधी?

गेवराईतील कारवाईमुळे मनोरंजनाच्या परवान्याआड जुगार सुरू असल्याच्या प्रकारांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. यापूर्वी प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांनी मांजरसुंबा परिसरात हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या कथित जुगार अड्ड्यावर कारवाई केली होती. त्या वेळीही लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनेक जणांना ताब्यात घेण्यात आले होते.

तथापि, केवळ एखाद्या ठिकाणी छापा टाकून थांबण्याऐवजी बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील अशा आस्थापनांची नियमित तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. बीड शहर, पिंपळनेर, बीड ग्रामीण, अंबाजोगाई, माजलगाव, परळी, केज आणि इतर भागांतील परवानाधारक पत्त्यांचे क्लब व मनोरंजन केंद्रांच्या कामकाजाची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

परवाना मिळाला म्हणजे कोणत्याही अटींचे उल्लंघन करण्याची मुभा मिळत नाही. परवान्यातील अटी, वेळेचे बंधन आणि लागू असलेल्या कायदेशीर नियमांचे पालन होत आहे की नाही, याची पोलिस व संबंधित प्रशासनाने खातरजमा करावी. नियमबाह्य जुगार सुरू असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. गंभीर किंवा वारंवार नियमभंग करणाऱ्या आस्थापनांचे परवाने रद्द करण्याबाबतही सक्षम प्राधिकरणाने नियमानुसार निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मयुरेश अस्वले ची विभागीय कराटे स्पर्धेमध्ये निवड

बीड : दि. 13 ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे झालेल्या शालेय जिल्हास्तर कराटे स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा चि. मयुरेश अस्वले 74 किलो वजन गटात जिल्ह्यात प्रथम आला आहे व त्याची विभागीय स्पर्धेकरिता झाल्याबद्दल म. शि. प्र. मंडळाचे कार्यकारणी सदस्य भारत आबा सोळंके यांच्या हस्ते मयुरेश चा सत्कार करण्यात आला मयुरेश हा सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या इंडोअर मध्ये सातत्याने सराव करत असतो, त्याला महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. नवनाथ आवारे, प्रा. प्रविण कोरडे, डॉ. चंद्रकांत फड, यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याच्या या यशबद्दल म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह कें का. सदस्य भारतआबा सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य प्रो.डॉ. अभय सोळुंके उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक, प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम प्रयत्नशील

3 लाख लोकांसाठी जिव्हाळ्याच्या असलेल्या पाणीप्रश्नावर माजी आ.सय्यद सलीम यांची न्यायालयात पुन्हा याचिका

बीड दि.१७ (प्रतिनिधी):- नगरपरिषद अंतर्गत असलेल्या अमृत अटल पाणीपुरवठा योजनेचे ९५ टक्के काम पूर्ण होऊनही, केवळ नगरपरिषदेकडे असलेल्या ३६ कोटी वीजबीलाच्या थकबाकीमुळे असल्याने नवीन अतिरिक्त वीजभार जोडणी मिळत नसल्याने धुळखात पडून आहे. हा प्रश्न निकाली लागवा आणि शहरातील ३ लाख नागरिकांची तहान भागावी यासाठी आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांची तळमळ आहे. यामुळे आ. संदीप क्षीरसागर हे प्रत्येक अधिवेशनात हा जिव्हाळ्याचा मुद्दा उपस्थित करीत आहेत. मात्र यावर शासन लक्ष देत नाही. तसेच अनेकवेळा आ. क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी महावितरण आणि जिल्हाधिकारी यांच्याही बैठका घेऊन ही अडचण सोडविण्याची मागणी केली. तसेच याप्रकरणी सन २०२४ मध्ये त्यांनी औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने डीपीडिसीतून निधी उपलब्ध करुन प्रश्न सोडविण्याचे निर्देश दिले होते. तरीही यावर काहीच हालचाल झाली नाही. सध्या दुष्काळी परिस्थिती पाहता डिसेंबर पासून शहराला पाणी मिळेल की, नाही हा गंभीर प्रश्न आहे. यामुळे पुन्हा आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी परत हा प्रश्न न्यालयाते घेऊन गेले असून, औरंगाबाद खंडपीठात अवमान याचिका दाखल केली आहे. यावर आता ४ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

बीड शहराची सध्या ३ लाख लोकसंख्या आहे. या लोकसंखेच्या तुलनेत ४० एमएलटी पाणी मिळणे आवश्यक असताना केवळ ३० टीएमएलटी पाणी मिळत आहे. त्यात माजलगाव बॅकवॉटरचे २४ आणि बिंदुसरा पाणीपुरवठा योजना

अंबाजोगाई तालुक्यातील आकोला येथे चंदन चोरीचा प्रयत्न फसला, दोघांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई : अंबाजोगाई तालुक्यात मौल्यवान चंदनाच्या झाडांची चोरी (Theft) करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, आकोला येथे चंदन चोरीचा प्रयत्न स्थानिक शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे फसला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा (FIR) दाखल केला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील आकोला येथील शेतकरी मधुकर पांडुरंग आगळे यांच्या मालकीच्या गट नंबर १८६ मधील शेतात ही घटना घडली. दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास शेतात लावलेले चंदनाचे झाड तोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. आरोपी (Accused) राम अंकुश गायकवाड (वय २७, रा. तांदुळजा, ता. जि. लातूर) हा चंदनाचा गाभा घेऊन जात असताना शेतकऱ्यांनी त्यास रंगेहात पकडले. त्यानंतर त्यास पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

विक्रीचा प्लॅन फसला

पोलिसांनी चौकशी केली असता, आरोपीने चोरी केलेला चंदनाचा गाभा हा मुरुड येथील राजू गायकवाड (रा. मुरुड, ता. जि. लातूर) यास विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची कबुली दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दुसऱ्या आरोपीसही या गुन्ह्यात सहआरोपी केले आहे.

पोलिसांची कारवाई

या प्रकरणी पोलीस अंमलदार बाबूराव माणिकराव घुगे (नेमणूक - पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण) यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास (Investigation) पोलीस करत आहेत. दरम्यान, चंदन हे अतिशय मौल्यवान वृक्ष असून त्याच्या तोडीसाठी वन विभागाची परवानगी लागते. विनापरवाना चंदनाची तोड व विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील चंदनाच्या झाडांची नोंद वन विभागाकडे करावी आणि संशयित व्यक्ती दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन केले आहे.

सतीश चव्हाण यांना विजयी करा : आमदार प्रकाश सोळंके

मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आवाहन

माजलगाव प्रतिनिधी : मराठवाडा पदवीधर मतदारसंघ हा व्यापक आणि सुजाण मतदारांचा मतदारसंघ आहे. पदवीधरांचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने प्रयत्न करणारे आणि कार्यपूर्तीवर भर देणारे नेतृत्व म्हणून सतीश भानुदासराव चव्हाण यांना पाठिंबा देण्याचे आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ आयोजित संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, पदवीधर मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी कमी होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. सुशिक्षित मतदारांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मतदानाचा हक्क बजावून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी पदवीधरांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, बाबुराव पोटभरे, जयसिंग सोळंके, सहाल चाऊस, भारत सोळंके, योगिता तौर, अमरनाथ खुरपे, ॲड. बी. आर. डक, सुरेंद्र रेहदासनी, तुकाराम येवले, संभाजी शेजुळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी सतीश चव्हाण यांना जाहीर पाठिंबा दिला.

भगवान भक्ती गडावर परंपरेच्या दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

पंडित, मुंदडा, क्षीरसागर, निर्मळ, पवार, देशमुख यांचे आवाहन

बीड - प्रतिनिधी : बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट अर्थात आपला भगवान भक्तीगड येथे गेल्या एक तपा पासून ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात होणारा पारंपरिक दसरा मेळाव्याची तयारी अंतिम टप्यात आली असून या आपल्या दसरा मेळाव्यात चांगल्या विचारांचे सोने लुटण्यासाठी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहवे असे आवाहन माजी मंत्री बदामराव पंडित, अक्षय मुंदडा, डॉ.योगेश क्षीरसागर, माधव निर्मळ, शिवराज पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.*

गेल्या एक तपा पासून वंचित, ऊसतोड मजूर, कामगार, सर्वसामान्याच्या नेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात अखंड सुरू असणारा बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावरील दसरा मेळावा यंदाही मोठ्या उत्साहात होणार आहे. याची तयारी जोरदार सुरू असून या दसरा मेळाव्याची संदर्भात आज बीड जिल्हा भाजप कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, केज विधानसभा मतदार संघाचे नेते अक्षय मुंदडा, बीड विधानसभेचे नेते डॉ योगेश क्षीरसागर, माजलगाव मतदार संघाचे नेते माधव निर्मळ गेवराई चे युवानेते शिवराज पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी मंत्री बदामराव पंडित म्हणाले की, या मेळाव्याची परंपरा मोठी आहे, लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पासून आज ना. पंकजाताई मुंडे यांच्या पर्यंत हा दसरा मेळावा अविरत सुरू असून या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले. तर युवा नेते अक्षय मुंदडा यांनी हा मेळावा आता पर्यंत जसा शिस्तीत आणि नियोजन बद्ध होत आलेला आहे, जिल्ह्यातच नाही तर राज्यात असा भव्यदिव्य मेळावा कदाचित होत असेल यंदा देखील हा दसरा मेळावा त्याच शिष्टब्ध आणि नियोजन पद्धतीने करून आपल्या नेत्याची उंची कशी उंचावेल यासाठी सर्वांनी तयारी करावी असे सांगितले, तर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी जिल्ह्यातील नियोजन कसे असावे, जास्तीत जास्त लोकांची व्यवस्था कशी करता येईल, यासंदर्भात सूचना करत सर्वांनी या मेळाव्यास उपस्थिती राहण्याचे आवाहन केले.

यावेळी अदित्य सारडा रामदास बडे, अजय सवाई, गणेश लांडे, इर्शाद भाई, बाळासाहेब चोले, शांतिनाथ डोरले,विष्णू महाराज सुरवसे, संगीत धसे, शैलजा मुसळे, प्रमोद पुसरेकर, प्रीत कुकडेजा, संजय गंभीरे, शरद इंगळे, श्रीकांत सानप, ज्योतिबा नन्नवरे, भूषण पवार, भारत गायकवाड,दत्तप्रसाद जाधव, नानासाहेब शिंदे, शुभम धूत, कतांगळे, विलास बामणे, सुशील जाधव, केशव बडे, भालचंद्र कुलकर्णी, मच्छिंद्र यादव, संतोष गवळी, घोलप मामा, विठ्ठल ठोकळ, सूरज बासर आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत उन्हाची तीव्रता लक्षात घेता आपली काळजी घेण्याचे आवाहन करण्या सोबतच आपल्या जवळ पाणी ठेवण्याचे तसेच सकाळी 11 वाजेपर्यंत सभास्थळी पोहचावे, तसेच आपली परंपरा आपला दसरा मेळावा हे ब्रीद लक्षात ठेऊन सामाजिक सलोखा कायम राहण्याचे आवाहन करण्यात आले.

डिजिटल साधनांचा वापर करून वाचनाची आवड जोपासावी ! :-प्रो.डॉ. भगवान डोके

पाटोदा (प्रतिनिधी) : भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ज.भ.शि.प्र. मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने 'डिजिटल युगातील वाचन संस्कृती आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. या प्रसंगी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना सामुहिक अभिवादन करण्यात आले.

'डिजिटल युगातील वाचन संस्कृती आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर' या एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्रो. डॉ. सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रो.डॉ. भगवान रामभाऊ डोके उपस्थित होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रा. केशव सुर्वे हे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करून वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी ग्रंथालयाच्या प्रभावी वापराची आवश्यकता विशद केली.

कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्रो. डॉ.भगवान डोके यांनी डिजिटल युगात वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. या साधनांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानात भर घालावी, वाचनाची सवय विकसित करावी आणि अभ्यास अधिक प्रभावी बनवावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. केशव सुर्वे होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी वाचन हे ज्ञानप्राप्तीचे आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पुस्तकांसोबतच डिजिटल माध्यमांचाही वापर करावा .असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले, तर बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. राऊत कल्याणी जितेंद्र हिने उपस्थित मान्यवर, प्राध्यापकवृंद आणि सहभागी सर्वांचे आभार मानले. या ऑनलाइन कार्यशाळेला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मलाबार गोल्ड एंड डायमंड्सचा विस्तार अधिक मजबूत

अहिल्यानगर : जगातील चौथ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ज्वेलरी रिटेल ब्रँड आणि 'द रिस्पॉन्सिबल ज्वेलर' म्हणून ओळख असलेल्या मलाबार गोल्ड एंड डायमंड्सने महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील आपल्या शोरूमचा नव्याने शुभारंभ केला आहे. या माध्यमातून कंपनीने या परिसरातील आपली रिटेल उपस्थिती अधिक मजबूत केली आहे.५,६३२ चौरस फूट क्षेत्रफळात विस्तारलेल्या या शोरूममध्ये गोल्ड, डायमंड्स, प्लॅटिनम आणि सिल्वर दागिन्यांचा खास संग्रह उपलब्ध आहे. विविध प्रसंग, आवडी आणि ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन येथे दागिन्यांच्या विविध आकर्षक डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत. मलाबार गोल्ड एंड डायमंड्सच्या रिटेल मानकांनुसार या शोरूमची रचना करण्यात आली असून, ग्राहकांना दागिन्यांची खरेदी करताना आरामदायी आणि आनंददायी अनुभव मिळेल, याची काळजी घेण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील क्लिनिकल रिसर्च परिसंस्था बळकट

मुंबई : इंडियन सोसाइटी फॉर क्लिनिकल रिसर्च आणि सेंटर फॉर हेल्थ एप्लाइड नॉलेज एंड रिसर्च ऑटोनॉमी यांनी महाराष्ट्रभर जबाबदार, नैतिक आणि उच्च-गुणवत्तेची क्लिनिकल रिसर्च क्षमता बळकट करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. बीसीजी आणि हेल्थकोइस यांच्या जुलै 2026 मधील बिल्ट ऑन स्केल, टुरनिंग टू सायन्स या अहवालानुसार, भारतातील लाइफ सायन्सेस नवोन्मेष परिसंस्थेला गती मिळत आहे. गेल्या दशकात भारतात 10 हून अधिक नवीन औषध ॲसेट्स विकसित झाले असून, नवोन्मेषाची पाइपलाइन सुमारे 1.5 पटीने विस्तारली आहे. मात्र, भारताची लोकसंख्या आणि रोगभार यांच्या तुलनेत क्लिनिकल रिसर्चमधील भारताचा सहभाग अजूनही तुलनेने कमी आहे.

सॅमसंगकडून 'बिग, बिगर, बिगेस्ट' सेलिब्रेशनची घोषणा

गुरुग्राम - सॅमसंग इंडियाने आज 'बिग, बिगर, बिगेस्ट' मोहिमेची घोषणा केली, ज्यासह ग्राहकांना यंदा सणासुदीच्या काळात व्हिजन एआय-सक्षम मोठ्या स्क्रिन आकाराच्या टीव्हींच्या श्रेणीवर आकर्षक ऑफर्सचा आनंद घेता येईल. सण-उत्सवाचा उत्साह, कौटुंबिक मेळावे आणि एकत्र घालवलेल्या संध्याकाळच्या संकल्पनेवर आधारित ही मोहीम ग्राहकांना अधिक उत्साहवर्धक अनुभव घेण्यासाठी सॅमसंगच्या अत्याधुनिक एआय-सक्षम टेलिव्हिजनवर अपग्रेड करणे अधिक सुलभ बनवते.या फेस्टिव्ह ऑफर्सचा भाग म्हणून निवडक सॅमसंग टीव्ही खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १,१०,९९० रुपयांपर्यंत मोफत सॅमसंग साउंडबार किंवा १,५९,९९० रुपयांपर्यंत मोफत सॅमसंग व्हिजन एआय टीव्ही मिळू शकतो. या ऑफरमध्ये २० टक्क्यांपर्यंत कॅशबॅक, झिरो डाऊन पेमेंटचे पर्याय आणि ३ वर्षांची सर्वसमावेशक वॉरंटी यांचाही समावेश आहे, ज्यामुळे ग्राहकांना या सणासुदीच्या काळात त्यांचा घरातील मनोरंजनाचा अनुभव अपग्रेड करणे अधिक सुलभ होते.

'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट' उपक्रम

महाराष्ट्र, ऑक्टोबर २०२६: हिमालया बेबीकेअरने स्माइल फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्रातील सीएचसी, औरंगाबाद येथे 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन केले. या उपक्रमात समुदाय-स्तरीय आरोग्य जनजागृती उपक्रम आणि संवादांच्या माध्यमातून 85 हून अधिक माता आणि बाळांना सहभागी करून घेण्यात आले. या उपक्रमातून माता आणि बालकांचे आरोग्य चांगले राहावे, तसेच लहान मुलांची योग्य वाढ आणि विकास होण्यासाठी काय काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करण्याच्या दोन्ही संस्थांच्या प्रयत्नांना बळ मिळाले. 7 ऑगस्ट 2026 रोजी सीएचसी, औरंगाबाद येथे हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 85 हून अधिक माता आणि बाळांनी सहभाग घेतला. या उपक्रमातून माता आणि बाळांना एकत्र आणून बाळाची योग्य काळजी घेण्याच्या पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

'सोने पे डबल सुहागा' ऑफर,

मुंबई : गेल्या सणासुदीच्या हंगामातील आपल्या 'सोने पे सुहागा' मोहिमेला मिळालेल्या भरघोस यशानंतर फिलिप्स होम अप्लायन्सेस आता अधिक भव्य 'सोने पे डबल सुहागा' या सणासुदीच्या संकल्पनेसह पुन्हा सज्ज झाली आहे. सणासुदीच्या काळात दिलेले आश्वासन आणखी एक पाऊल पुढे नेत ही मोहीम ग्राहकांना पात्र फिलिप्स होम अप्लायन्सेसच्या खरेदीवर खात्रीशीर भेटवस्तू देण्यासोबत दर तासाला ९,९९९ रुपये किमतीचे सोने आणि दररोज ५०,००० रुपये किमतीचा हिरा जिंकण्याची उत्साहवर्धक संधी देऊन सणासुदीच्या खरेदीचा आनंद अधिक उत्साहित करते.गेल्या वर्षी 'सोने पे सुहागा' मोहिमेने ७० शहरांमध्ये ग्राहकांसाठी नवा अनुभव तयार करत पारंपरिक सणासुदीच्या ऑफर्सच्या पलीकडे झेप घेतली होती.

'एक्सयूव्ही 3एक्सओ झेडएनजी बाजारात

मुंबई : भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड हिने 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी' ही आपली पहिली सर्वसामान्य ग्राहकांसाठीची सीएनजी प्रवासी कार बाजारात आणली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत ९.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे. 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मुळे सीएनजी गाड्यांमधूनही वेगवान आणि उत्साही ड्रायव्हिंगचा अनुभव घेता येतो, हे दिसून येईल. या गाडीत टर्बोचार्ज्ड इंजिन आहे. सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारच्या इंधनांवर हे इंजिन ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. ही गाडी प्रति किलो सीएनजीमध्ये २४.७ किलोमीटरचे प्रमाणित मायलेज देते. त्यामुळे ड्रायव्हिंगचा आनंद कायम ठेवून इंधनावरील खर्च कमी करण्याचा पर्याय ग्राहकांना मिळतो.

एआय प्लस स्मार्टफोनकडून सुधारणांवर भर

मुंबई : एआय प्लस स्मार्टफोन प्रत्यक्ष वापरकर्त्यांचा अभिप्राय उत्पादन आणि सेवा सुधारणांमध्ये समाविष्ट करून आपला ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन अधिक बळकट करत आहे. ग्राहकांची परीक्षणे, रोजचा डिव्हाइस वापर आणि विक्रीपश्चात संवाद यांतून मिळालेल्या माहितीच्या आधारे, ब्रँड सॉफ्टवेअर अपडेट्स, अधिक कसून चाचण्या आणि अधिक तत्पर ग्राहक सहाय्याद्वारे कॅमेरा स्थिरता, कनेक्टिव्हिटी आणि परफॉर्मन्स यांसंबंधी चिंतांवर उपाय करत आहे. हा दृष्टिकोन एआय प्लस स्मार्टफोन च्या केवळ वापरकर्त्यांसाठीच नव्हे, तर त्यांच्यासोबत मिळून उत्पादन घडवण्याच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे.आपल्या स्मार्टफोन पोर्टफोलिओमध्ये ग्राहकांनी एआय प्लस स्मार्टफोन ची रचना, कॅमेरा क्षमता, बॅटरी लाइफ, परफॉर्मन्स आणि पैशाचे पुरेपूर मूल्य यासाठी प्रशंसा केली आहे.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची आर्थिक कामगिरी जाहीर

छत्रपती संभाजीनगर : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ने आज सप्टेंबर 2026 मध्ये संपलेल्या तिमाहीची आर्थिक कामगिरी जाहीर केली. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या पूर्णवेळ संचालक आणि अंतरिम मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री कॅरोल फुर्टाडो म्हणाल्या, "वाढीचा वेग कायम ठेवण्यासाठी संचालक मंडळाने 409 कोटी रु. ची भांडवल उभारणी करण्यास प्राधान्य वाटपाद्वारे मंजुरी दिली आहे. या माध्यमातून इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन, बजाज लाइफ इन्शुरन्स लिमिटेड, एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स आणि आदित्य बिर्ला सन लाइफ इन्शुरन्स यांच्याकडून निधी उभारला जाणार आहे.

डॉ. अभय धानोरकर यांच्याकडून कन्नड तालुक्यातील चार प्राथमिक आरोग्य केंद्रांची पाहणी

आरोग्य सेवा, औषधसाठा, स्वच्छता आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा घेतला आढावा

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सुविधांचा दर्जा उंचावावा, या उद्देशाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी कन्नड तालुक्यातील हातनूर, चापानेर, औराळा आणि वडनेर या प्राथमिक आरोग्य केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा, औषधसाठा, मनुष्यबळ आणि विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अभियान संचालकांनी दिलेल्या सूचनांनुसार १७ ते १९ ऑक्टोबरदरम्यान जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून प्राथमिक आरोग्य केंद्रांची पाहणी करण्यात येत आहे. याच अनुषंगाने डॉ. धानोरकर यांनी संबंधित आरोग्य संस्थांना भेटी देऊन तेथील कामकाजाची तपासणी केली.

पाहणीदरम्यान बाह्यरुग्ण विभागाचे कामकाज, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवा, औषधांची उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णालयातील विविध सुविधांची स्थिती तपासण्यात आली. आरोग्य संस्थांचा परिसर, प्रसूती कक्ष आणि इतर विभागांतील स्वच्छतेचीही पाहणी करण्यात आली. रुग्णांना वेळेत आणि समाधानकारक सेवा मिळण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ व वैद्यकीय साहित्याचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

माता व बाल आरोग्य सेवा, नियमित लसीकरण, असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व उपचार, तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी संबंधित नोंदवह्या, अभिलेख आणि दस्तऐवजांची पडताळणी करून नोंदी अद्ययावत व अचूक ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकासकामांचीही पाहणी करण्यात आली. ही कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामकाजात आढळणाऱ्या त्रुटींचे तातडीने निराकरण करून आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करावी, असे निर्देश डॉ. धानोरकर यांनी दिले.

या भेटीदरम्यान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. योगेश सोळंके आणि श्री. चंदन गणोरे उपस्थित होते. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप कांबळे, डॉ. रहमान, डॉ. मेघा शेवगन, डॉ. प्रतीक्षा राजपूत, डॉ. अभिषेक राठोड यांच्यासह संबंधित आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

एमजीएम विद्यापीठात 'स्वयंभू 2026' महोत्सवाचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (जेएनईसी) 'स्वयंभू २०२६' महोत्सवाचे रुक्मिणी सभागृहात उद्घाटन झाले. या कार्यक्रमाला धूत ट्रान्समिशन्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल धूत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी आर. के. फार्मा इन्क. ग्रुप ऑफ कंपनीचे प्रमुख डॉ. नंदकुमार पाटील, कालिका स्टीलचे संचालक यश गोयल, पोर्टिको डिझाइन कॉन्सेप्टचे मुख्य वास्तुविशारद गोपाल तनवानी आणि फिनटेक इंजिनिअर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी सलील बंगाळे यांची उपस्थिती होती.

एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, प्राध्यापक आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

राहुल धूत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात उतरण्यापूर्वी मूलभूत तांत्रिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. शैक्षणिक ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्ये आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित केल्यास अभियांत्रिकी क्षेत्रात यशस्वी होता येते, असे त्यांनी नमूद केले.

उद्घाटनानंतर 'इंजिनिअरिंग फ्युचर्स : नेव्हिगेटिंग करिअर्स, इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्योरशिप' या विषयावर परिसंवाद झाला. यामध्ये शिक्षण आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव, सैद्धांतिक ज्ञान व व्यावहारिक कौशल्यांमधील अंतर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) सजग वापर, निर्णयक्षमता आणि समस्या सोडविण्यात नेतृत्वाची भूमिका या विषयांवर चर्चा करण्यात आली.

गोपाल तनवानी यांनी पहिल्या ग्राहकासोबत काम करताना मिळणाऱ्या अनुभवाचे महत्त्व स्पष्ट केले. यश गोयल यांनी बदलत्या काळानुसार नवीन प्रवाह आणि तंत्रज्ञान स्वीकारल्याने व्यवसायात सकारात्मक बदल घडतात, असे सांगितले. सलील बंगाळे यांनी प्रत्येक कामात स्वतःहून पुढाकार घेणे हे नेतृत्वाचे पहिले पाऊल असल्याचे नमूद केले. डॉ. नंदकुमार पाटील यांनी पदवी शिक्षणाच्या काळात सातत्याने आणि तत्परतेने प्रयत्न केल्यास भविष्यातील यशाचा भक्कम पाया तयार होतो, असे सांगितले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव साजरा

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१८: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १००वर्ष पूर्ण झालेले असतांना, दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी गंगापूर शहरात संघाचे भव्य पथ संचलन काढण्यात आले. धूत कन्या प्रशाला येथून सुरु झालेले सघोष संघ संचालन रहिवाशी परिसरासह शहरातील मुख्य बाजार पेठेतून प्रवास करत काळाराम मंदिर, पेशवेनगर येथे संघ संचलनाचा समारोप झाला. या प्रसंगी संघ स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालनाच्या वेळी जागोजागी नागरिकांनी स्वयंसेवकावर पुष्पवृष्टी करत संघाप्रति आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. उल्लेखनीय बाब म्हणजे काही दिवसापूर्वी एका दुर्दैवी अपघातामध्ये स्वयंसेवक अरुण साध्ये यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्याची वाटी पूर्ण निकामी झालेली असतांना आणि पायाला प्लास्टर केलेले असतांना ही संचलनाला पूर्णवेळ उपस्थित असणारे अरुण साध्ये यांच्या संघ निष्ठा आणि समर्पणाची उपस्थितीकांमध्ये चर्चा होती.

आंतरविद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना रौप्यपदक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक प्राप्त केले.या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या कु.संस्कृती वानखेडे आणि कु.सानिया तडवी यांनी चमकदार कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला.विशेष अभिमानाची बाब म्हणजे,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या मुलींच्या बुद्धिबळ संघाने गेल्या तीन वर्षांपासून आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सातत्याने पदकांची कमाई केली आहे.या सातत्यपूर्ण यशामुळे महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रातील परंपरा अधिक बळकट झाली आहे.विद्यार्थिनींची मेहनत,जिद्द,चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यांमुळे हे यश संपादन करणे शक्य झाले.

या यशस्वी विद्यार्थिनींना महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ.निलेश गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी सराव आणि स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर हे यश मिळविले. या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच संस्थेतील पदाधिकारी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रातील आपली यशस्वी परंपरा कायम राखत पुन्हा एकदा महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

विजयादशमीला श्री बालाजी मंदिरात छबिना मिरवणूक

तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- राजस्थान युवक मंडळ, पैठण यांच्या वतीने विजयादशमीच्या (दसरा) शुभमुहूर्तावर पैठणच्या प्राचीन आणि प्रसिद्ध अश्या श्री बालाजी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त श्री बालाजी भगवान यांचा अभिषेक, महाआरती तसेच छबिना मिरवणूक काढण्यात येणार असून, या धार्मिक उत्सवात सर्व समाजबांधवांनी सहपरिवार सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ४.३० वाजता श्री बालाजी भगवान यांचा अभिषेक, सकाळी ७.३० वाजता महाआरती आणि सकाळी ८ वाजता छबिना मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे विजयादशमीच्या निमित्ताने शहरातील भक्तिमय वातावरणात भर पडणार आहे.

छबिना मिरवणुकीचा मार्ग श्री बालाजी मंदिर, दुर्गावाडी, मामा चौक, पावले गल्ली, नाथ मंदिर, नवग्रह मंदिर आणि गजानन मारोती मंदिर मार्गे पुन्हा श्री बालाजी मंदिर असा राहणार आहे.या उत्सवात सर्व समाजातील बंधू-भगिनींनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होऊन धार्मिक परंपरा आणि संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

विजयादशमीच्या निमित्ताने आयोजित या धार्मिक सोहळ्यात पैठणमधील समाजबांधव आणि भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राजस्थान युवक मंडळ, पैठण यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अनवाणी पावलांना मिळाला मायेचा आधार, विद्यार्थ्यांना दिलासा!

राहाता (वार्ताहर) एखाद्याच्या अडचणी पाहून केवळ हळहळ व्यक्त करण्यापेक्षा त्या दूर करण्यासाठी पुढाकार घेणे, हीच खरी माणुसकी! याच संवेदनशीलतेचा प्रत्यय नांदुर्खी येथील उद्योजक भाऊसाहेब रामचंद्र चौधरी यांनी पुन्हा एकदा दिला. रयत शिक्षण संस्थेच्या शारदा शैक्षणिक संकुलातील अनवाणी पायांनी शाळेत येणाऱ्या जवळपास ३०० विद्यार्थ्यांना मोफत चप्पल उपलब्ध करून दिल्या. तसेच वाढत्या तापमानाचा विचार करून वर्गांसाठी क्रॉम्प्टन कंपनीचे १७ पंखे भेट दिले. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला, तर शालेय संघाला ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले. या उपक्रमांतर्गत एकूण सुमारे ८० हजार रुपयांची मदत करण्यात आली.

भाऊसाहेब चौधरी व साई भक्त रवींद्र जोशी हे शारदा शैक्षणिक संकुल जवळ जात असताना त्यांना काही विद्यार्थी अनवाणी पायांनी शाळेत जात असल्याचे चौधरी यांच्या निदर्शनास आले. उन्हाची तीव्रता आणि रस्त्यावरील खड्यांमुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास पाहून त्यांचे मन हेलावले. आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना चप्पलविना शाळेत जावे लागत असल्याची जाणीव होताच त्यांनी या विद्यार्थ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला त्यानुसार उद्योजक चौधरी यांनी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मोफत ३०० चप्पल चे वाटप व विद्यार्थ्यांना उष्णतेपासून दिलासा मिळावा म्हणून शैक्षणिक संकुलाला १४ पंखे देऊन सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाऊसाहेब चौधरी यांनी नियमित व्यायाम करावा, चांगले मित्र जोडावेत आणि निरोगी व आनंदी जीवन जगण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी सुमनताई वाबळे, शारदा संकुलाचे स्कूल कमिटी अध्यक्ष रमेश शिंदे , विद्यालयाचे प्राचार्य तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोसम बर्डे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर : सोयगाव तालुक्यातील घोरकुंड येथील मोसम सांडू बर्डे (वय.६५)यांचे दि.१६ शुक्रवार मध्य रात्री १ :०० वाजता निधन झाले.त्यांच्यावर सकाळी १०:३० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होत.पोलीस कर्मचारी राजू बर्डे यांचे ते वडील होत

महाकाळ परिवाराची देवींची सातव्या माळीला पुजा राहते रात्रीची

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि 18. नवरात्र उत्सवात महाकाळ परिवाराची चौथ्या पिढीपासून सातव्या माळीला असते रात्री चे जागरण महाकाळ परिवाराची चौथ्या पिढीपासून चालत आलेल्या नवरात्र उत्सवात दरवर्षी प्रमाणे सातव्या माळीला रात्री चे जागरण करण्यात येते यामध्ये सर्व महाकाळ भावबंध यांच्या कडून पहिल्या माळीला प्रत्येक भावबंध यांच्या घरून देव वाजत गाजत आणतात आणि महाकाळ परिवारात तीन मुख्य घर आहेत त्या घरामध्ये समधीर आहे प्रत्येक या घरामध्ये एका एका वर्षी हे देव बसतात यामध्ये नवरात्र मध्ये ज्या घरी देव बसणार त्या घरामध्ये रंगरंगोटी करण्यात येते देवघर रोज फुलमाळ यांनी सजविण्यात येते सात दिवस सकाळ संध्याकाळ आरती करण्यात येते तसेच सातव्या माळीला सर्व भावबंध महिला मुले मुली आणि बाहेर गावी गेलेले महाकाळ परिवाराची सदस्य या सातव्या माळीला घरी येतात सातव्या माळीला रात्रभर भजन म्हणतात आणि महिला महाप्रसादाची तयारी करतात यादिवशी रात्री देवाचे रिंगण भरतात या रिंगणात सर्व प्रकारचे फळे, कडधान्य, यापासून हे रिंगण भरण्यात येते आणि रात्री दोन वाजता देवाची आरती करण्यात येते त्यानंतर नैवेद्य तिन्ही घरातील समीदर याठिकाणी नैवेद्य दाखवून सर्व महाकाळ परिवाराची सदस्य महिला पुरुष मुलं मुली आणि नातेवाईक या प्रसादाचा लाभ घेतात आणि विशेष या प्रसादाचे एक कण सुध्दा खाली पडू देत नाही तसेच राहिलेले पाणी,प्रसाद सर्व झाल्यावर त्या समीदर मध्ये टाकून ते समीदर तीन वर्षांसाठी झाकून टाकण्यात येते अशा प्रकारे महाकाळ परिवाराची देवाची सातव्या माळीला सर्व आनंद घेतात आणि या नवरात्राची पुन्हा वाट पाहत असतात

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए.क्र.592/2026

अर्जदार :-१) कमलाबाई आप्पासाहेब लांडे, वय. ५५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. माहोली ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) कल्याण आप्पासाहेब लांडे, वय. ३४ वर्षे, धंदा, शेती, रा. माहोली ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सागर आप्पासाहेब लांडे, वय. ३१ वर्षे, धंदा, शेती, रा. माहोली ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण -वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, आप्पासाहेब बाळकृष्ण लांडे हे मौजे माहोली ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०१/०७/२०२६ रोजी मौजे माहोली ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे आप्पासाहेब बाळकृष्ण लांडे यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप/उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : 15/10/2026.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए.क्र. 738/2026

अर्जदार :-१) आशा ज्ञानेश्वर काजळे, वय. ३९ वर्षे, धंदा, शेती, रा. गुरूधानोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) ऋतुजा ऋषिकेश नजन, वय. २० वर्षे, धंदा, घरकाम, रा. मनिषानगर, लांझी रोड, जय मल्हार चौक, वाळुज ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) राजकुमार ज्ञानेश्वर काजळे, वय. १७ वर्षे, धंदा, शिक्षण, अ.पा.का. आई अर्जदार क. १ ४) रामनाथ नाना काजळे, वय ७८ वर्षे, धंदा, शेती, रा. गुरूधानोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) गयाबाई रामनाथ काजळे, वय ७२ वर्षे, धंदा, शेती, रा. गुरूधानोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, ज्ञानेश्वर रामनाथ काजळे हे मौजे गुरूधानोरा ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०४/०२/२०२४ रोजी मौजे गुरूधानोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असून मयत आहेत. अर्जदार क. १ ते ५ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे ज्ञानेश्वरं रामनाथ काजळे यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ ही विवाहीत मुलगी असून अर्जदार क. ३ हा अज्ञान मुलगा असून अर्जदार क. ४ वडील आणि अर्जदार क. ५ आई आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : 15/10/2026

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए.क्र.734/2026

अर्जदार :-१) जिजाबाई मुरलीधर साळुंके, वय. ७६ वर्षे, धंदा, शेती, रा. घोडेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) भानुदास मुरलीधर साळुंके, वय. ५२ वर्षे, धंदा, शेती, रा. घोडेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) कृष्णा मुरलीधर साळुंके, वय. ४६ वर्षे, धंदा, शेती, रा. घोडेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) चंद्रकला जयदेव म्हसारे, वय. ५० वर्षे, धंदा, शेती, रा. अगरकानडगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) शंकुतला दत्तात्रय देवकर, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. जामगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) संगीता शिवनाथ घुले, वय. ४२ वर्षे, धंदा, शेती, रा. घोडेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :-वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड.एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, मुरलीधर गोंविदा साळुंके हे मौजे घोडेगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०८/१०/२०२३ रोजी मौजे घोडेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ६ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे मुरलीधर गोंविदा साळुंके यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले असून अर्जदार क. ४ ते ६ हया विवाहीत मुली आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-15/10/2026.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

रोखठोक

दिनेश गुणे

लांडगा आला रे...

जगातील जवळपास प्रत्येक भाषेत लोककथांची परंपरा मोठी आहे. काही लोककथा तर जागतिक बोधकथा म्हणून सांगितल्या गेल्या आहेत. अशाच प्रसिद्ध लोककथांपैकी एक असलेली मेंढपाळाच्या खोडसाळ मुलाची गोष्ट ऐकत आपल्या अनेक पिढ्या मोठ्या झाल्या. या लोककथेचा संदेश सर्वांच्या मनावर कोरला गेला असला, तरी त्यानुसार वागण्याचे संस्कार मात्र पिढ्यान्पिढ्यांपासून समाजमनावर फारसे झालेले नाहीत. म्हणूनच, एखादे जीवघेणे संकट येणार, याचे संकेत मिळतात तेव्हा सारे सावध होतात; संकट सरताच पुन्हा जुन्या बेफिकिरीने जगरहाटी सुरू राहते. कोविड महामारीच्या काळातील अनुभव आणि त्यापासून बोध घेतल्याच्या आवेशात घेतल्या गेलेल्या आणाभाका आता प्रत्यक्ष आचरणात आल्या असत्या, तर खरे म्हणजे उभ्या जगात आज केवळ माणुसकीचे निर्मळ झरे वाहताना दिसले असते. माणसे माणसाशीच नव्हे, तर निसर्गातील प्रत्येक घटकाशी माणसासारखी वागत आहेत, कोणत्याही विकृतीला जगात कोठेही थारा राहिलेला नाही, भ्रष्टाचार, भांडणे, भूक, भय आदी माणसाच्या मुळावर आलेल्या वाईट गोष्टी पूर्णपणे इतिहासजमा झाल्या आहेत आणि संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या प्रार्थनेस परमेश्वराने 'तथास्तु' म्हटल्यावर व्हावे एवढे सारे काही सुंदर झाले आहे, असे दृश्य जगभर दिसले असते. मात्र, कोविडचे ते जीवघेणे संकट सरल्यावर सुरू झालेल्या नव्या जगरहाटीने त्याआधी शिल्लक असलेल्या माणुसकीलाही आव्हान देण्याचा पवित्रा घेतला. युद्धखोरी, भय, भूक, भ्रष्टाचाराने जागतिक कळस गाठला की पुन्हा एखादे संकट आलेच, तर त्यानंतर हे सारे करता येईल किंवा नाही अशा भयाने त्याचा विक्रम करण्याची जणू स्पर्धा सुरू झाली. अशा काळातच एखादी आवई पुन्हा उठते. एखादे नवे संकट जगावर कोसळणार असे इशारे जारी होतात आणि माणसे जागी होतात. संकटास तोंड देण्याच्या सावधगिरीसाठी स्पर्धा सुरू होते. सर्वात आधी सुरक्षिततेची सारी साधने आपल्या हाती मिळावीत याकरिता प्रचंड चढाओढ सुरू होते. यामध्ये जो शिरजोर ठरतो, तो संकटकाळ निभावून नेतो आणि सुरक्षिततेच्या साधनांअभावी संकटास तोंड देणाऱ्यांना संकटासमोर निमूटपणे गुडघे टेकावे लागतात.

मेंढपाळाच्या खोडसाळ पोराच्या त्या गोष्टीतील संदेशाचा या मानवी स्वभावाशी फार जवळचा संबंध आहे. एखाद्या सुंदर माळरानावर हिरवाईची चादर पसरलेली असताना, मेंढपाळांची पोरे आपापल्या मांजरातील शेळ्या-मेंढ्या चरावयास घेऊन जातात, जनावरे निवांतपणे चरायला लागली की, पोरांचे गप्पांचा अड्डा रंगतो. कुणी मैदानी खेळ खेळू लागतात तर कुणी फडक्यात बांधून आणलेल्या कांदा-चटणी-भाकरीची न्याहारी करून गवताच्या गादीवर निर्धास्तपणे आडवे होतात. अशा निवांत क्षणी एका खोडसाळ पोराला गंमत करायची लहर येते; आणि तो ओरडतो, 'लांडगा आला रे, आला...' अचानक सावध होत सगळी पोरं मेंढरांच्या दिशेने धावतात. कुरणात चरणाऱ्या शेळ्या-मेंढ्यांभोवती संरक्षक कडे तयार करतात. काहीही करून आपल्या मेंढरांना लांडग्याच्या कळपाची शिकार होऊ द्यायचे नाही यासाठी जिवाची बाजी लावून उभे राहतात. आवई उठविणारं ते खोडसाळ पोरगं मात्र बाजूच्या झाडावर बसून फांदीवरून फजिती झालेल्यांची गमत बघत फिदीफिदी हसत असतं. एकदा फसगत झाल्यावर ओशाळलेली मेंढपाळांची पोरं पुन्हा खेळात रमतात. आता त्यांना या खोडसाळ पोराची जिरवायची असते. पुढच्या एका दिवशी अशाच एका गाफिल क्षणी, ते पोरगं पुन्हा तीच मस्करी करतं, तेव्हा कुणीच त्याकडे लक्ष देत नाही. नंतर एका दिवशी पुन्हा तसेच घडते आणि खोडसाळ पोराचीच फजिती झाल्याच्या आनंदात आता बाकीची पोरं फिदीफिदी हसू लागतात. आता तो ओरडला तरी त्याकडे कुणीच लक्ष देणार नाही हे नक्की झालेलं असताना, एका दिवशी खरेच लांडग्यांची टोळी मेंढरांच्या कळपाच्या दिशेने येताना त्या खोडसाळ पोराला दिसते. तो जिवाच्या आकांताने ओरडतो, 'लांडगा आला रे आला...' पण यावेळी त्याच्याकडे कुणीच लक्ष देत नाही. सारेजण निर्धास्तपणे गप्पा मारत बसून राहतात आणि इकडे एक एक मेंढराची शिकार करत लांडगे निघून जातात.

सातत्याने उठणारी एखादी आवई किंवा सतत दिला जाणारा एखादा इशारा खरा ठरत नाही, असे लक्षात येऊन त्याबाबत बेफिकीर राहणाऱ्या समाजाला सतत सावध राहण्याचा संदेश देणाऱ्या या लोककथेपासून समाजाने बोध घेतला असता, तर अनेक संकटे टाळता आली असती, असे म्हणतात. पण एखादे संकट येणार एवढे सांगितल्यावरही पुरेशी सावधगिरी न बाळगल्याने त्याचे फटके सोसावे लागतात आणि शहाणे न झाल्याचा पश्चात्ताप व्यक्त करण्याची वेळ माणसावर येते. लांडगा येणार या आवईकडे दुर्लक्ष केल्यानंतर जेव्हा खरेच लांडगे हल्ला करतात, तेव्हाच्या बेफिकिरीशी ही सवय मिळतीजुळती असल्यामुळेच, गंभीर इशाऱ्यांची वेळीच दखल घ्यावयास हवी किंवा केवळ बेफिकिरीने त्याकडे दुर्लक्ष न करता गंभीरपणाने त्याकडे पाहावयास हवे. कोणताही इशारा वाऱ्यावर सोडू नये, ही बाब आता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. गेल्या काही दशकांतील संकटांचे इशारे आणि त्याबाबत माणसाच्या प्रतिक्रिया पाहता, 'लांडगा येणार' या आवईकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षानंतर खरोखरीच लांडग्यांचा हल्ला झाल्यावर जे काही होते, तशी वेळ येणार हे ध्यानात ठेवण्याची गरजही आता तीव्र होऊ लागली आहे. म्हणूनच, राजधानी दिल्लीतील शाळांमध्ये बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरविणाऱ्या इशाऱ्यांकडे डोळेझाक करून चालणार नाही.

दिल्लीतील किमान सहा शाळांमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारे ई-मेल एकाच दिवशी मिळाले आणि सावधगिरीच्या उपाययोजना अमलात आणण्यासाठी यंत्रणांची अक्षरशः धावपळ सुरू झाली. तपासणीनंतर या धमक्या म्हणजे निव्वळ अफवा असल्याचे निष्पन्न झाले. गेल्या दोन वर्षांत अशा धमक्या देणारे शेकडो ई-मेल वेगवेगळ्या ठिकाणी गेले, पण त्यामागील व्यक्तींचा शोध घेण्यात तपास यंत्रणांना आलेले यश तसे मर्यादितच होते. जानेवारी २०२५ मध्ये एका अल्पवयीन विद्यार्थ्यावर अनेक धमकीच्या ई-मेल प्रकरणांतील संशयित म्हणून बोटे रोखली गेली होती. अशा धमक्या म्हणजे केवळ अफवा असतात, हे लक्षात आल्यावर पुन्हा सारे काही सुरळीत होते. शाळेच्या आवारात बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल येतो. विद्यार्थ्यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवले जाते, पालकांची घबराट उडते, पोलिसांचे पथक दाखल होते, बॉम्बशोधक व नाशक पथक परिसराची तपासणी करते. काही तासांच्या तणावानंतर संशयास्पद काहीच आढळत नाही. धमकी खोटी ठरते आणि सगळे सुटकेचा निःश्वास टाकतात. शाळा पुन्हा सुरू होते. पालक मुलांना नेहमीप्रमाणे शाळेत पाठवू लागतात. काही दिवसांनी पुन्हा तीच घटना घडते. अशा धमक्या सातत्याने मिळू लागल्या आणि त्या निव्वळ अफवा असल्याचे स्पष्ट होऊ लागले की, समाजाच्या मनात नेमका तोच प्रश्न तयार होऊ लागतो. प्रत्येक धमकीला एवढे गांभीर्याने किती दिवस घेत राहायचे, अशी मानसिकता तयार होऊ लागते. त्यातून निर्माण होणाऱ्या बेफिकिरीमागे संकटाचा गंभीर धोका दबा धरून बसतो. कारण वारंवार खोट्या ठरणाऱ्या धमक्या आणि प्रत्यक्ष हल्ल्याची शक्यता यांच्यातील फरक ओळखण्याची क्षमता कमी होणे, ही सुरक्षा व्यवस्थेसमोरील मोठी गुन्हेगारी समस्या आहे. त्यामुळेच, दिल्लीतील शाळांना मिळणाऱ्या बॉम्बच्या धमक्यांच्या वाढत्या घटनांकडे केवळ खोडसाळपणा, अफवा किंवा कायदा-सुव्यवस्थेचा किरकोळ प्रश्न म्हणून पाहता येणार नाही. या घटनांमागे भीती निर्माण करणे, प्रशासकीय यंत्रणेची क्षमता खर्ची घालणे, सार्वजनिक संस्थांवरील विश्वास डळमळीत करणे आणि कधी कधी प्रत्यक्ष हल्ल्यासाठी अनुकूल मानसिक परिस्थिती निर्माण करणे अशा वेगवेगळ्या शक्यता असू शकतात, याकडे डोळेझाक करता येणार नाही. वारंवार खोट्या धमक्या दिल्या गेल्यामुळे पुढील खऱ्या हल्ल्यासाठी लोकांची दक्षता कमी होऊ शकते, ही एक रास्त चिंता आहे; मात्र प्रत्येक धमकीमागे प्रत्यक्ष स्फोट घडवण्याचा कट असतो किंवा खोट्या धमक्या देणारे गुन्हेगार जाणीवपूर्वक समाजात दुर्लक्षाची मानसिकता तयार करत असतात असेही नाही. तरीही, प्रत्यक्ष स्फोटके सापडले नाहीत म्हणून त्या घटनेचे गांभीर्य संपत नाही. कारण, धमकी देणारी व्यक्ती प्रत्यक्ष बॉम्ब न ठेवताही मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक यंत्रणा कामाला लावू शकते, शाळांचे कामकाज विस्कळीत करू शकते आणि हजारो कुटुंबांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करू शकते.

डिसेंबर २०२४ मध्ये दिल्लीतील किमान ४० शाळांना धमकीचे ई-मेल पाठवून शिवाय पैशांची मागणीही करण्यात आली होती. त्या वेळीदेखील शाळांची काटेकोर तपासणी, मुलांना घरी नेण्यासाठी भयभीत पालकांची तारांबळ आणि सुरक्षा यंत्रणांची प्रचंड धावपळ झाली होती. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे काही महत्त्वाचे प्रश्न अधोरेखित होतात. अशा धमकी देताना, खोडसाळपणा, वैयक्तिक सूड, खंडणी, प्रसिद्धी, परीक्षा टाळणे की व्यापक दहशत निर्माण करणे यापैकी नेमका कोणता हेतू असू शकतो. वारंवार दिल्या जाणाऱ्या अशा धमक्यांमुळे पोलिस, शाळा आणि पालकांच्या निर्णयक्षमतेवर काय परिणाम होतो किंवा एखादी धमकी प्रत्यक्ष धोक्याची असण्याची शक्यता असताना, आधीच्या खोट्या धमक्यांमुळे सुरक्षा यंत्रणा किंवा नागरिक कमी सावध होण्याचा धोका कसा टाळायचा, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. वारंवार खोट्या धमक्या मिळाल्यानंतर निर्माण होणाऱ्या मानसिक थकव्याला जगभरातील शाळांच्या सुरक्षा उपाययोजनांबाबतच्या अभ्यासात वेगळे महत्त्व दिले गेले आहे. मेंढपाळाच्या खोडसाळ मुलाच्या त्या गोष्टीप्रमाणे, वारंवार खोटा इशारा दिल्यानंतर खरा धोका समोर आला तरी लोक त्याकडे दुर्लक्ष करू शकतात आणि इशाऱ्याबाबतची संवेदना कमी होणे हीच बाब सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

अमेरिकेतील कोलोरॅडो राज्यातील कोलंबाईन हायस्कूलमध्ये १९९९ मधील एका दिवशी दोन विद्यार्थ्यांनी बेधुंद हल्ला केला. त्यामध्ये १३ जणांचा मृत्यू झाला; त्यानंतर दोन्ही हल्लेखोरांनी आत्महत्या केली. त्या हल्ल्यानंतर अमेरिकेतील शाळांना हिंसाचाराच्या धमक्या देण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. त्या हल्ल्यानंतर पुढच्या ५० दिवसांत पेनसिल्व्हेनियातील शाळांमध्ये हिंसाचाराच्या ३५४ धमक्या नोंदविल्या गेल्या होत्या. म्हणजे, अशा प्रकारे घडणाऱ्या एखाद्या मोठ्या हिंसक घटनेनंतर त्याचीच पुनरावृत्ती करणाऱ्या घटना वाढू शकतात, असा निष्कर्ष त्या वेळी काढला गेला होता. अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यांनंतर विमानतळ, उंच इमारती, शाळा आणि महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी बॉम्बच्या धमक्या देण्याच्या अफवांचे तर पीक आले होते. एकट्या न्यू यॉर्क शहरातच तशा धमकीचे शेकडो दूरध्वनी आल्याने सुरक्षा यंत्रणांची तारांबळ उडाली होती. एखाद्या वास्तविक दहशतवादी घटनेनंतर समाजात आधीच भीती निर्माण झालेली असते. अशा वेळी खोटी धमकी देणाऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष हिंसाचार न करताही अधिक परिणाम घडवून आणता येतो. पोलिसांची धावपळ, वाहतूक किंवा संस्थांचे कामकाज विस्कळीत होणे, माध्यमांमध्ये प्रसिद्धी आणि लोकांमध्ये घबराट हेच अशा गुन्हेगारीचे उद्दिष्ट असू शकते, तरीही त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. म्हणूनच, दिल्लीतील घटनांच्या विश्लेषणातही हीच बाब महत्त्वाची आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी दिल्लीतील शाळांना मिळालेल्या धमकीआधी, एप्रिल २०२४ मध्ये दिल्लीतील २५० हून अधिक शाळांना धमक्या देणारे ई-मेल पाठविले गेले होते आणि त्यामागे कोणा परदेशी व्यक्तीचा हात असल्याचा सुगावा सुरक्षा यंत्रणांना लागला होता. मात्र, या व्यक्तीचा माग काढण्यात फारसे यश आले नव्हते. जून २०२५ मध्ये गुजरात पोलिसांनी ११ राज्यांतील २१ हून अधिक बॉम्ब धमक्यांशी संबंधित एका संशयित महिलेला अटक केली होती.

बॉम्बची खोटी धमकी किंवा अफवा पसरविण्याच्या अशा घटना प्रत्यक्षात न आल्यामुळे निरुपद्रवी ठरत नाहीत. कारण अशा घटनांमुळे सार्वजनिक यंत्रणेचा वेळ वाया जातो, शैक्षणिक नुकसान होते, पालकांचे आर्थिक नुकसान होऊ शकते आणि विद्यार्थ्यांच्या मनात दीर्घकाळ भीती राहू शकते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी केवळ अटक आणि शिक्षा पुरेशी नाही. गुन्हा करण्यास सोपे वाटणारे वातावरण बदलणे, तपासातील तांत्रिक अडचणी कमी करणे आणि धमकीमुळे अपेक्षित होणारी प्रसिद्धी किंवा व्यत्यय मर्यादित ठेवणे हेही आवश्यक आहे. दिल्लीतील धमक्यांच्या इशाऱ्यानंतर धमकी देणाऱ्यांचा शोध, डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण, विविध घटनांमधील संबंध शोधणे आणि शाळांमध्ये विश्वासार्ह सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे आदींबाबत मोठे आव्हान उभे राहिले आहे. कारण शाळा ही भीतीचे केंद्र बनता कामा नये. मुलांनी शाळेत जाताना बॉम्बची भीती बाळगू नये आणि पालकांचा प्रत्येक दिवस अनिश्चिततेच्या भीतीखाली संपू नये. त्यासाठी केवळ अधिक पोलिस किंवा अधिक तपासण्या पुरेशा नाहीत. गुन्हेगाराला ओळखण्याची क्षमता, तातडीने योग्य निर्णय घेणारी यंत्रणा आणि नागरिकांचा विश्वास या तीन बाबींची खरी गरज आहे. ■

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

दुष्काळाचे आव्हान स्वीकारा

राज्य सरकारने २६ सप्टेंबर रोजी राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला. या पृष्ठभूमीवर पाण्याचे योग्य नियोजन, शेतकऱ्यांना आधार आणि पशुधनाचे संरक्षण या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दुष्काळाचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर जाणवू शकतो. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि इतर स्थानिक जलस्त्रोतांमधील पाण्याची पातळी कमी झाल्यास काही गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक कठीण होते. नागरिकांना पाण्याचा वापर मर्यादित करावा लागतो, तर काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज निर्माण होते. पावसाच्या अनिश्चिततेचा थेट परिणाम शेतीवर होतो. पिकांना आवश्यक वेळी पाणी न मिळाल्यास त्यांची वाढ खुंटू शकते, उत्पादन घटू शकते. अशा वेळी पीक नुकसानाचे वेळेवर पंचनामे, पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि आवश्यक कृषी मार्गदर्शन यांना महत्त्व आहे. शेतकऱ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवणे आणि त्यांना योग्य वेळी मदत मिळवून देणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

अनेकदा कमी चर्चिला जाणारा पैलू म्हणजे जनावरांसाठी निर्माण होणारी चारा आणि पाण्याची टंचाई. पावसाअभावी गवताची वाढ कमी होते. चारा पिकांचे उत्पादन घटू शकते आणि शेतातील कडबा, भुसा यांसारख्या चाऱ्याची उपलब्धताही मर्यादित होऊ शकते. अशा परिस्थितीत गायी, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांना पुरेसा चारा व स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे पशुपालकांसाठी मोठे आव्हान ठरते. पशुधन हे अनेक कुटुंबांसाठी उत्पन्नाचे साधन आणि आर्थिक सुरक्षिततेचा आधार असल्याने त्याचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी गावपातळीवर चारा नियोजन, चारा साठवणूक, मुरघास निर्मिती आणि चारा पिकांच्या नियोजनाला प्रोत्साहन द्यावे. गरजेनुसार चारा छावण्या, पशुवैद्यकीय सेवा आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. शासन, ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि पशुपालक यांनी समन्वयाने काम केल्यास या संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. तसेच बदलते हवामान, वाढती उष्णता आणि अनियमित पर्जन्यमान यांमुळे जलव्यवस्थापनाचे आव्हान अधिक गुंतागुंतीचे होत आहे. तापमान वाढल्याने बाष्पीभवन वाढू शकते आणि जमिनीतील ओलावा कमी होऊ शकतो. याचा परिणाम पिके, वृक्षसंपदा आणि नैसर्गिक जलस्त्रोतांवर होतो. त्यामुळे जलस्त्रोतांचे संवर्धन, वृक्षांचे संगोपन आणि स्थानिक पर्यावरणाचे संरक्षण या गोष्टींकडे दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

दुष्काळावर मात करण्याची सुरुवात प्रत्येक घरापासून करावी. त्यासाठी नळ उघडा ठेवू नये आणि पाण्याची गळती त्वरित दुरुस्त करावी. दात घासताना, आंघोळ करताना आणि भांडी धुताना आवश्यक तेवढेच पाणी वापरावे. गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. पावसाचे पाणी साठवण्यासाठी घरांमध्ये आणि सोसायट्यांमध्ये व्यवस्था करावी. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करावा. पिण्याचे पाणी स्वच्छ भांड्यात साठवून त्याचा अपव्यय टाळावा.

उष्णतेच्या काळात स्वतःची, ज्येष्ठ नागरिकांची, लहान मुलांची आणि बाहेर काम करणाऱ्या कामगारांची काळजी घ्यावी. पशुपक्ष्यांसाठी शक्य असेल तेथे स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. पाणी बचत ही केवळ दुष्काळाच्या काळापुरती मर्यादित न राहता आपल्या जीवनशैलीचा कायमस्वरूपी भाग बनली पाहिजे.

जयदीप सुधीर हिरवे/पुणे।९०९६२७६४८३

■■■

देशविरोधी घटकांना कायद्याचा हिसका दाखविलाच पाहिजे

गेल्या काही महिन्यांपासून राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, अभिजित दीपके, वामपंथी, काही स्वयंघोषित बुद्धिजीवी आणि ल्युटियन्स मीडियाने भारताची राजधानी असलेले दिल्ली शहर वेठीस धरले आहे. प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, अभिजित दीपके, अरविंद केजरीवाल आणि राहुल गांधींनी देशात अराजकता, हिंसाचार करून सत्तापरिवर्तन करण्याची जाहीर धमकी दिली आहे. काही स्वयंघोषित निष्पक्ष मराठी वर्तमानपत्रे (तरुण भारत नाही) अशा देशविरोधी वक्तव्यांचे उघडपणे, आश्चर्यकारक समर्थन करीत आहेत. सर्वोच्च न्यायालयात मोर्चा नेऊन राहुल गांधींनी आपल्या राजकीय अपरिपक्वतेचे आणि बुद्धीच्या दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन केले आहे.

भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या उंबरठ्यावर उभा असताना देशात अराजकता माजवून भारतीय प्रगती रोखण्यासाठी काही नतद्रष्ट विरोधी पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहेत. भारत स्वयंपूर्ण होणे काही पाश्चात्त्य देशांना सहन होणार नाही. अशा देशांचे समर्थन करून विरोध पक्ष भारताला कमजोर करण्यासाठी हिंसक आंदोलने करीत आहेत. सॅम पित्रोदा, एलॉन मस्क, डोनाल्ड ट्रम्प जाहीरपणे भारतीय लोकशाहीचा अपमान करत आहेत. भारत सर्वच क्षेत्रात आश्चर्यकारक प्रगती करत असल्याने पाश्चात्त्य देशात अस्वस्थता आहे. विद्यार्थी आंदोलनाच्या नावाखाली आंदोलने करणारा कॉक्रोच जनता पक्ष आता मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी आंदोलने करत आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने कठोर कारवाई करून हिंसाचार करण्याच्या जाहीर धमक्या देणाऱ्यांवर देशद्रोही असल्याचा ठपका ठेवून त्यांना तुरुंगात डांबले पाहिजे. एकीकडे भारत चौफेर प्रगती करत असताना आणि नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आत्मनिर्भर होत असतांना अशी आंदोलने भारताला परवडणारी नाहीत. वास्तविक अभिजित दीपके आणि त्यांच्या पक्षाला आंदोलनासाठी पैसा कोण पुरवत आहे याचा धांडोळा घेतला पाहिजे. विमानाच्या बिझिनेस क्लासमधून प्रवास, पंचतारांकित हॉटेलमधील वास्तव्य, आलिशान गाड्यांचा ताफा यासाठी पैसा येतो कुठून हे शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे. केंद्र सरकारने देशविरोधी घटकांना हिंसक आंदोलन करण्यासाठी देशात मोकळे रान न देता, देशवासीयांना धमक्या देणाऱ्यांना कायद्याचा हिसका दाखविलाच पाहिजे. त्याशिवाय हे अर्बन नक्षलवादी ताळ्यावर येणार नाहीत.

शिवराम वैद्य/पुणे।९८५०५१८०१८

■■■

शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा

दसरा तोंडावर अन् दिवाळी जवळ आली, तरी शेतकऱ्यांच्या घरात चिंतेचा अंधार कायम आहे. अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले. शेतातील उभे पीक उद्ध्वस्त झाले आणि शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी मदतीबाबत केलेल्या घोषणांकडे शेतकरी आशेने पाहत आहेत. आता प्रश्न एकच आहे, घोषणा झाली, पुढे काय? शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा कधी होणार? शेतकऱ्याला

भाषणातील आश्वासनांवर दिवाळी साजरी करता येत नाही. त्याला खतांची उधारी फेडायची आहे, मजुरांचे पैसे द्यायचे आहेत, मुलांना कपडे घ्यायचे आहेत आणि घरात दिवाळीचा किराणा भरायचा आहे. हातात पैसा नसेल तर सणांचा आनंद तरी कसा साजरा करायचा? सरकारने मदतीची घोषणा केली असेल तर ती वेळेत देण्याची जबाबदारीही सरकारने पार पाडली पाहिजे. शेतकऱ्यांना आश्वासनांचे गोडधोड नको, त्यांच्या खात्यात मदतीचा पैसा हवा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे वेळेत पूर्ण झाले पाहिजेत. पात्र शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे कोणताही शेतकरी वंचित राहता कामा नये. पाच हजार रुपयांची मदत मिळाली तरी मोठ्या नुकसानीची भरपाई होणार नाही, हेही सरकारने लक्षात घेतले पाहिजे. शेतीचा वाढता खर्च, कर्जाचा बोजा आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. त्यामुळे मदतीची रक्कम आणि तिच्या वाटपाबाबत सरकारने स्पष्टता ठेवणे गरजेचे आहे. सणासुदीच्या काळात नेत्यांच्या घरात दिवे लागतील, बाजारपेठा उजळतील; पण शेतकऱ्याच्या घरात चूल पेटवण्यासाठी पैशांची चणचण असेल, तर विकासाच्या घोषणांचा उपयोग काय? शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्यासाठी भाषण नको, तर जमिनीवर उतरलेली कृती हवी! सरकारने दिलेला शब्द पाळावा, मदत वेळेत पोहोचवावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. कारण शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणे ही केवळ घोषणा करण्याची बाब नाही, तर ती सरकारची जबाबदारीही आहे. शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा; घोषणांचे फटाके फोडून त्यांच्या आशांशी खेळू नका!

सचिन नागरे/९६०४३२१४३२

■■■

शक्तीची पूजा

नवरात्र हे शक्तिदेवतेचे रूप आहे. घरचं रूप कितीही सजलेलं असलं तरी त्याचं अंतरंग हे स्त्री शक्तीतूनच खुलत असतं. कारण घरच्या केंद्रस्थानी स्त्री ही अनेक शक्तिरूपांनी दर्शन नित्य घडवत असते. ती घरात घडवित्याची भूमिका निभावत असते. आज घराघरात एकाच वेळी अनेक आघाड्यांवर ती कार्यरत असते. एकीकडे स्वयंपाक करता करता फोन घेणे, कामवाल्या बाईंची चौकशी करणे, आल्यागेल्यांचे चहापाणी करणे, किराणा, दळण, नवीन प्रोडक्ट काय आले याची चौकशी करणे, नवीन गॅजेट्सशी हातमिळवणी करणे, एखादा महत्त्वाचा ई-मेल पाठवणे एकाच वेळी करू शकते, जणू अष्टभुजाच होऊन वावरत असते. कधी मुलांना चांगल्या सवयी लागाव्या म्हणून दुर्गावती होते, कधी अभ्यास घेताना सरस्वती होते. घरातल्या सगळ्यांवर प्रेम करून संतुष्ट करणारे संतोषी माता होते. अशा प्रकारे सर्वत्र चैतन्य पसरवते. ज्यांच्याकडे नवरात्र बसते म्हणजेच घट बसविले जातात, त्यांच्याकडे लगबग सुरू होते; ती थेट नवमीला पारणे झाल्यावर पूर्ण होते. रोजची माळ, पूजा, उपासना, नैवेद्य, दोन वेळेला आरती, भजन, कुमारिका पूजन इत्यादींची मनातल्या मनात मांडणी सुरू होते. सगळं निर्विघ्नपणे पार पडू दे म्हणून मनोमन प्रार्थना गृहिणी करत असते. कुणी भजनी मंडळात जातात तिथे नऊ दिवसांचे नऊ वार कुणाकुणाकडे भजन ठरले असते. तिथे जायचे म्हणजे घरच्यांची पोटोबाची व्यवस्था याचे नियोजन तिला करावे लागते. रोज वेगवेगळ्या घरी गेल्यामुळे त्या भागाचे दर्शन, जाण्यायेण्याचा काळ, मैत्रिणींसोबत होत असलेले हास्यविनोद याने मन आनंदी राहते. इतरांच्या वस्त्रांचा वेगवेगळ्या रंग मन मोहून घेते. सगळीकडे सकारात्मकता जाणवते. कुठे भजन, स्पर्धेत भाग घेते. शाळा, कॉलेज, ऑफिस आणि इतर कामाच्या ठिकाणीही महिला रंगांचे दिवस पाळतात त्यामुळे वातावरण रंगीबेरंगी होते. या दिवसात कुमारिकांचे पूजन केले जाते. त्यांचा थाट काही औरच असतो. एकाच दिवशी दोन-तीन घरी जावे लागते. भेटवस्तूंची रेलचेल असते. कुमारिका मोहक दिसतात. अष्टमीला घागरी फुंकून महालक्ष्मीची आराधना करतात. आजही स्त्री सगळ्या शक्तिदेवतेच्या उत्सवात सहभागी होत असते तेही घराचे घरपण सांभाळून. या उत्सवात नतमस्तक होत असताना तिला दहा हत्तींचं बळ प्राप्त होतं तोच शक्तिदेवतेचा प्रसाद असावा.

दसऱ्याला नवीन वस्तूंची खरेदी केली जाते. नव्या-जुन्या वाहनांची पूजा, निर्जीव शस्त्रांची पूजा या दिवशी केली जाते. सजीव निर्जीवात देवत्व शोधणाऱ्या आपल्या संस्कृतीचं विलोभनीय दर्शन दिसू लागतं. अशा घरातल्या आणि आसपास वावरणाऱ्या अनेक शक्तींचं दर्शन या दिवसात होत असतं. पुढे येणाऱ्या आसणी, दिवाळीसाठीही ती सज्ज असते. या अखंड चैतन्याचा स्त्रोत तिच्यात असतो. तो असाच वाहत राहो.

स्नेहल प्रकाश खंडागळे/नागपूर

■■■

नवरात्रीच्या खरेदीवर आंदोलनाचे सावट

नवरात्रीपासून देशभरात सणासुदीची आणि खरेदीची धूम सुरू होते. व्यापारी वर्ग याच काळात होणाऱ्या खरेदीवर अवलंबून असतो. मात्र, याच मोसमात कॉक्रोच जनता पार्टी आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील विरोधकांकडून दिल्लीतील जंतर-मंतरसह इतर ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांमुळे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांवर विपरीत परिणाम होत आहे. पितृपक्षात ग्राहक सहसा नवीन वस्तूंची खरेदी किंवा शुभकार्यांची सुरुवात करत नाहीत. त्यामुळे नवरात्रीची सुरुवात होताच कपडे, दागिने, इलेक्ट्रॉनिक्स, गाड्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या बाजारपेठेत तेजी येते. परंतु, एस.आर.आय. व इतर राजकीय मुद्यांवरून रस्ते अडवणे, पोलिसांचे बॅरिकेट्स आणि सुरक्षा व्यवस्थेमुळे वाहतूक ठप्प होणे यामुळे ग्राहकांना बाजारात पोहोचणे कठीण होत आहे. दिल्लीसह इतर अनेक भागांतील प्रमुख बाजारपेठांमधील ग्राहकसंख्या घटल्याची तक्रार स्थानिक व्यापारी संघटना करीत आहेत.

'आम्ही महिनाभर सणासुदीची वाट पाहतो. सण सुरू होताच राजकीय पक्षांच्या आंदोलनांमुळे बाजार बंद ठेवावे लागणे किंवा ग्राहकांनी पाठ फिरवणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. राजकीय पक्षांनी आपल्या मागण्या मांडताना लहान-मोठ्या दुकानदारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या उपजीविकेचा विचार करायला हवा' अशी भावना स्थानिक दुकानदारांकडून व्यक्त केली जात आहे.लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार असला, तरी सणासुदीच्या काळात या अशा महत्त्वाच्या काळात होणाऱ्या आंदोलनांमुळे सामान्य जनतेला आणि व्यापारी वर्गाला मोठा आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे राजकीय आंदोलनांचे नियोजन करताना व्यापाऱ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी जोर धरत आहे. ■

अविनाश देशपांडे/पुणे

नवेगाव येथील पुरातन श्री गंगादेवी मंदिर

नवरात्रोत्सवाची सुरुवात होण्यापूर्वी म्हणजे १९ सप्टेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील नवेगाव ता. कुही याठिकाणी जाण्याचा योग आला. याठिकाणी एक अतिशय पुरातन देवीचे मंदिर आहे. नागपूरपासून ६० कि.मी. अंतरावर नागपूर-आंभोरा मार्गावरील मांढळपासून अंदाजे ३ किमी आत हे मंदिर आहे. मंदिर परिसरात पोहोचताच भव्य सभामंडप दृष्टिपथात येतो. त्याच्या बाजूलाच एक आकर्षक देवीची मूर्ती आहे. या देवीचे नाव आहे श्री गंगादेवी. काळ्या पाषाणाची अष्टभुजा महिषासुरमर्दिनी आहे. अतिशय रमणीय परिसर लाभलेले हे मंदिर सुमारे ७०० वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. विदर्भातील वाकाटककालीन इतिहास पुस्तकात या मंदिराचा उल्लेख आहे. नवेगावपासून २ किमी अंतरावर अडम या गावात पुरातत्त्व विभाग खोदकाम करीत असताना सुमारे १७०० वर्षे पुरातन नगर आढळले, ज्या खोदकामात घरे, नाल्या, रस्ते आढळून आले. इतिहास तज्ज्ञांच्या मते, या गावचा ग्रीस देशासोबत बांगड्यांचा व्यापार होत होता. मंदिरातील देवीच्या दर्शनासाठी नागपूरचे भोसले राजे येत, असाही उल्लेख आहे. गावातील एका भक्ताला या देवीची मूर्ती जवळच्या नदीत आढळली. ३ फूट उंच मूर्तीला बाहेर काढायला १२ बैलजोड्यांची गाडी लावावी लागली, असे म्हणतात. मूर्ती बाहेर काढल्यानंतर ही बैलगाडी ज्या ठिकाणी थांबली, त्याच ठिकाणी या गंगादेवीचे मंदिर तयार झाले आहे. मूर्ती नदीत सापडल्याने या देवीला गंगादेवी म्हणतात.

नवरात्रोत्सवात येथे मोठी यात्रा भरते. मंदिर परिसरात ग्रामदेवतेचे तसेच भैरवनाथाचे मंदिर असून गणपती, विठ्ठल रखुमाई, शंकराचे पंचायतन, हनुमान यांच्या गारीच्या बनवलेल्या मूर्ती आहेत. परिसरात हजार वर्षे जुने वडाचे झाड असून झाडांची मुळे गाभाऱ्यापर्यंत पसरली आहेत. नागपूर येथील कृष्णा कढव यांनी १९९५ मध्ये मित्र परिवाराच्या सहकार्याने मंदिराचा जीर्णोद्धार केला. देवस्थानाच्या माध्यमातून फक्त धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमही राबविले जातात. त्यात बाल संस्कार शिबिर, शेतकऱ्यांसाठी उद्बोधन शिबिर, रक्तदान शिबिर आदींचा समावेश आहे. ■

रवींद्र गोविंद पांडे/९३२५४५७०५२

श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

कन्या पूजन

प्रचलित कथेनुसार, बाणासुर नावाचा राक्षस भगवान शिवाचा परमभक्त होता. त्याने भगवान शिवांची कठोर तपश्चर्या केल्यानंतर प्रसन्न झालेल्या भगवान शंकरांनी त्याला वर मागण्यास सांगितले. त्यावर बाणासुराने आपला मृत्यू नैसर्गिकरीत्या न होता एखाद्या कुमारिकेच्या हातून व्हावा, अशी मागणी केली. भगवान शंकरांकडून वरदान मिळाल्यानंतर बाणासुर अधिक आक्रमक बनला आणि त्याचे अत्याचार वाढू लागले. त्रिभुवन त्याच्या अन्यायाने त्रस्त झाले. बाणासुराच्या अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी सर्व देवतांनी माता पार्वतीची आराधना करून त्याचा संहार करण्याची विनंती केली. त्यावरून मातेने कुमारिकेचा अवतार धारण करून बाणासुराचा वध केला. मातेचा हा अवतार कन्याकुमारी माता किंवा कन्यका परमेश्वरी म्हणून प्रसिद्ध आहे.

कन्याकुमारी येथील प्रसिद्ध मंदिर तामिळनाडू राज्यातील कन्याकुमारी जिल्ह्यात, बंगालचा उपसागर, अरबी समुद्र आणि हिंदी महासागर या तीन सागरांच्या त्रिवेणी संगमावर समुद्रातील एका बेटावर वसलेले आहे. भगवान परशुरामांनी आपल्या रेणुका मातेच्या स्मरणार्थ हे मंदिर समुद्राच्या मध्यभागी निर्माण केले, अशी आख्यायिका सांगितली जाते.

पुढे महाकालीचे परमभक्त आणि श्रीरामकृष्ण परमहंसांचे पट्टशिष्य स्वामी विवेकानंद यांनी या ठिकाणी अनुष्ठान करून आत्मचिंतन व साधना केली आणि मनःशांती प्राप्त केली, अशी श्रद्धा आहे. त्यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते एकनाथजी रानडे यांच्या पुढाकाराने येथे स्वामी विवेकानंद शिला स्मारक उभारण्यात आले. कन्यका परमेश्वरी ही वैश्य समाजाची आराध्य देवता मानली जाते. आंध्र प्रदेशातील पेनुगोंडा या गावात तिचे प्रसिद्ध मंदिर आहे. माता कन्यका परमेश्वरीच्या प्रतीकात्मक पूजेसाठी नवरात्रीतील अष्टमीच्या दिवशी अनेक भक्तांकडून कुमारी पूजन केले जाते. लहान कुमारिकांमध्ये देवीचे स्वरूप पाहून त्यांचे पूजन केले जाते आणि त्यांच्यामध्ये आदिशक्तीचा अंश आहे, या श्रद्धेने हा धार्मिक विधी भक्तिभावाने संपन्न केला जातो.

कन्या पूजनाचा हा विधी स्त्रीशक्तीचा, पावित्र्याचा आणि आदिशक्तीच्या कुमारिका स्वरूपाचा सन्मान करणारा आहे. नवरात्रीच्या या पवित्र पर्वात कुमारिकेचे पूजन करून तिच्यात देवीचे दर्शन घेण्याची परंपरा भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीच्या पूजनाचे आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. ■

उमरखेड।९४०३६०८११५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरित केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७६२८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

एमजीएममध्ये जागतिक अन्न दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्सेस अँड टेक्नॉलॉजीच्यावतीने दिनांक १४ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत चार दिवसीय 'जागतिक अन्न दिन २०२६' FOODNEXT2026 विविध शैक्षणिक, औद्योगिक आणि जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. अन्नसुरक्षा, पोषण, अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान, अन्नाची गुणवत्ता आणि अन्न उद्योगातील रोजगार व उद्योजकतेच्या संधी यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या चार दिवसीय कार्यक्रमात पोस्टर सादरीकरण स्पर्धा, फूड एक्स्पो स्पर्धा आणि फूड व्हिडिओग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांना अन्नविषयक वैज्ञानिक माहिती सर्जनशील पद्धतीने सादर करण्याची, नावीन्यपूर्ण खाद्यपदार्थांची संकल्पना मांडण्याची तसेच आधुनिक डिजिटल माध्यमांचा उपयोग करून अन्नसुरक्षा व पोषणाबाबत जनजागृती करण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांना अन्नप्रक्रिया आणि दुग्धव्यवसायातील प्रत्यक्ष औद्योगिक vअनुभव मिळावा, या उद्देशाने महानंदा डेअरी, छत्रपती संभाजीनगर आणि गांधेली येथील फूड अँड डेअरी प्रोसेसिंग प्लांटला औद्योगिक भेटी आयोजित करण्यात आल्या. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना दुग्धप्रक्रिया, अन्न उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि औद्योगिक कार्यपद्धती यांविषयी माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमांतर्गत चार दिवस विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची संवादात्मक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजीनगरचे माजी प्रादेशिक अधिकारी श्री. सुदाम थोटे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. अजित एस. खोजारे, ओमान येथील अन्नसुरक्षा व नियामक बाबींचे प्रमुख तांत्रिक तज्ज्ञ डॉ. सय्यद खाजा आरिफुद्दीन, S4S टेकनॉलॉजिस प्रा.ली., छत्रपती संभाजीनगर येथील संशोधन व विकास विभागाचे प्रमुख डॉ. स्वप्निल कोकाटे, अन्न व औषध प्रशासन, छत्रपती संभाजीनगरचे अन्नसुरक्षा अधिकारी श्री. फरीद सिद्दीकी, एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रीसर्च चे सहाय्यक प्राध्यापक डॉ. हृषिकेश काकडे आणि अश्वघोष एज्युकेशन अँड व्यायाम प्रसारक मंडळ महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका सुश्री अमरीन कादरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तज्ज्ञांनी उद्योजकता विकास, अन्नसुरक्षा नियमावली, अन्नप्रक्रिया उद्योगातील संशोधन व विकास, गुणवत्ता व्यवस्थापन, अन्न उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान आणि अन्न क्षेत्रातील करिअरच्या संधी यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. संवादात्मक सत्रांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजा समजून घेण्याबरोबरच आपल्या शंकांचे निरसन करून घेण्याची संधी मिळाली.

" F O O D - NEXT2026" या कार्यक्रमाचे आयोजन एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम ,कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

FOODNEXT2026 या कार्यक्रमाच्या संयोजिका म्हणून इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्सेस अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. अर्चना पंचे (हारके) यांनी काम पाहिले, तर सहसंयोजक म्हणून विभागप्रमुख डॉ. संजय हरके यांनी जबाबदारी सांभाळली. प्राध्यापक समन्वयक म्हणून सहाय्यक प्राध्यापिका डॉ. श्रुतिका के. देव आणि सहाय्यक प्राध्यापिका सहाय्यक प्राध्यापिका कल्याणी थोटे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात व अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साहाय्यक प्राध्यापक डॉ. मन्मथ डी. सोनटक्के, साहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन व्ही. मस्के, सहाय्यक प्राध्यापिका प्राजक्ता सी. शिंगणे, सहाय्यक प्राध्यापिका धम्मरत्ना ए. ठोके (गुठके) आणि साहाय्यक प्राध्यापक श्री. मुक्तानंद लोंढे यांनी सहकार्य केले.

एमजीएममध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि .१८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अध्ययन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई होते.

कार्यक्रमात डॉ. जॉन चेल्लादुराई यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत राष्ट्राच्या विकासातील आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानाचे महत्त्व विशद केले. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मिती या क्षेत्रांतील डॉ. कलाम यांचे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन ज्ञान, संशोधन आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

शिक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अमरदीप असोलकर यांनी प्रास्ताविकातून वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. वाचन हे ज्ञानप्राप्तीचे प्रभावी साधन असून, ते विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यास मदत करते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. भागवत वाघ, डॉ. रामेश्वर कणसे, डॉ. वैशाली माडजे, डॉ. रिहाना सय्यद, डॉ. मंजुश्री लांडगे, डॉ. सखाराम हरकळ, डॉ. चंद्रकांत लोखंडे, श्री. अतुल कुलकर्णी, श्री. अमोल विजया श्री. नीलेश बेडके, श्री. सौरभ वांढेकर, कु. साक्षी वाघ आणि श्री. प्रल्हाद रोडे यांनीही डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याविषयी व त्यांच्या प्रेरणादायी विचारांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक विकासासाठी कसा उपयोग होऊ शकतो, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राम गायकवाड यांनी केले. डॉ. कलाम यांच्या कार्याचा आणि विचारांचा परिचय करून देतानाच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करणे, ज्ञानाची आवड जोपासणे आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात योगदान देण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

"बाकीच्या सगळ्यांना आमचा हेवा वाटायचा" - माधुरी दीक्षित

छत्रपती संभाजीनगर - 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर माधुरी दीक्षित, रेणुका शहाणे आणि प्रिया बेर्डे यांची खास भेट रंगणार असून, या तिघी 'हम आपके हैं कौन'च्या चित्रीकरणादरम्यानचे मजेशीर किस्से सांगताना दिसणार आहेत. एकाच खोलीत राहण्यापासून ते मराठीतून तासनतास गप्पा मारण्यापर्यंतच्या आठवणींना उजाळा देताना सेटवरील मैत्री आणि धमाल पुन्हा अनुभवायला मिळणार आहे. सेटवर अनेक मराठी कलाकार आणि तंत्रज्ञ असल्यामुळे आणि त्यांची धमाल बघून दिग्दर्शक सूरज बडजात्या शॉट्सच्या मधल्या वेळेत मराठी चित्रपट बनवू शकतो, असं गमतीनं म्हणायचे.

हम आपके हैं कौन च्या शूट आधी कलाकारांची नावं समजल्यानंतर झालेला आनंद व्यक्त करताना माधुरी दीक्षित म्हणाली, "मला जेव्हा चित्रपटाची पटकथा मिळाली, तेव्हा यामध्ये आणखी कोण काम करत आहे, हे माहीत नव्हतं. पण जेव्हा समजलं की तुम्ही दोघीही या चित्रपटात आहात, तेव्हा मला खूप आनंद झाला. आता कोणीतरी असेल, ज्यांच्याशी मी मराठीत बोलू शकेन, गप्पा मारू शकेन आणि मस्ती करू शकेन, असं वाटलं. तुम्हा दोघींना भेटल्यानंतर खूप आपलेपणा जाणवला. तुम्ही मला माझ्या बहिणीच वाटायचात."

यावर प्रिया बेर्डे माधुरी दीक्षितला म्हणाल्या, "तुम्ही सुरुवातीपासूनच खूप सहज आणि आपुलकीनं वागायचात. तुम्हाला भेटल्यानंतर तुम्ही एवढ्या मोठ्या कलाकार आहात, हे तुम्ही कधीच जाणवू दिलं नाहीत. चित्रीकरणादरम्यान आपण एकाच खोलीत राहायचो. वेगळी खोली किंवा स्वतंत्र व्हॅनिटी व्हॅन असावी, असं कधी वाटलंच नाही. त्या काळातील सगळी धमाल आजही आठवते."

गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय - रंगनाथ काळे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचालित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे थोर स्वातंत्र्यसेनानी,महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,माजी खासदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष तथा अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.बाबुरावजी काळे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात मान्यवरांनी बाबुरावजी काळे यांच्या मराठवाड्याच्या विकासातील योगदानाला उजाळा दिला

याप्रसंगी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांनी अप्पासाहेबांच्या आठवणी सांगून मराठवाड्याच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. सोयगाव येथे अप्पासाहेबांच्या नावाने ग्रंथालय उभारण्यात येईल असे आपल्या मनोगतात सांगितले.गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय आहे.आणि ते पूर्ण करण्याचं काम आम्ही करत आहोतअसे ते म्हणाले. सर्व वक्त्यांनी अप्पासाहेबांच्या कार्याविषयी सखोल विचार मांडल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर भांदरगे यांनी बाबूरावजी काळे यांच्याशी असलेल्या आपल्या आठवणी सांगितल्या.ते म्हणाले की,आप्पासाहेबांनी मला ओळख दिली आणि पुढे जाण्याची संधी दिली.आज मी जे काही यश मिळवले आहे, त्यामागे त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत.त्यांनी मला स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले.बाबुरावजी काळे हे केवळ स्वतः काम

करणारे नेते नव्हते, तर इतरांना घडवणारे नेते होते, असे त्यांनी सांगितले.

माजी प्राचार्य डॉ.एजाज शेख 'मराठवाडा मुक्तिसंग्राम व राजकीय क्षेत्रातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करताना असे म्हणाले की, बाबुरावजी काळे यांनी विद्यार्थी दशेपासूनच हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभाग घेतला. त्यांनी समाजातील विविध घटकांतील लोकांना मदत केली आणि अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले.अप्पासाहेबांचे नेतृत्व प्रभावी होते. त्यांनी राजकीय क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळाली. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. नेतृत्व आणि सामाजिक कार्याच्या बाबतीत त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा संदर्भ देत अप्पासाहेबांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले.

यानंतर डॉ. विनोद बोरसे यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्रामातील आप्पासाहेबांचे योगदान' या विषयावर विचार मांडताना बाबुरावजी काळे यांचे जन्म गाव खर्चाने येथे प्रत्यक्ष भेट देऊन तयार केलेली चित्रफीत दाखवून व्याख्यानाची सुरवात केली. तसेच बाबुरावजी काळे यांचे सोयगाव येथील सहकाऱ्यांच्या सोबतीने केलेल्या सत्याग्रहाचा उल्लेख करत तेथील पोलिस मुक्तिसंग्रामाच्या विविध घटनांचा उल्लेख करत त्यांनी सोयगाव येथील झेंडा सत्याग्रह, विविध सभा, जंगल सत्याग्रह, शेंदुर्णी येथील शस्त्र प्रशिक्षण शिबिर आणि वाकोड येथील छावणी यांसारख्या उपक्रमांची माहिती दिली. निजामशाहीविरुद्धच्या आंदोलनात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी एकत्र येऊन सहभाग घेतल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपोषण, विविध नाक्यांवरील आंदोलने आणि हर्सल तुरुंगाशी संबंधित घटनांचाही त्यांनी उल्लेख केला.

प्रमुख पाहुणे द्वारकाभाऊ पाथ्रीकर यांनी अप्पासाहेबांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोठे असून, त्यांच्या नेतृत्वाची आठवण कायम राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर भांदरगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून द्वारकाभाऊ पार्थीकर, हरिश्चंद्र लधाने, तुकाराम पाटील, सुभाष चौधरी, विलासचन्द्र काबरा, अजिंठा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी माजी प्राचार्य अशोक नाईकवाडे, माजी प्राचार्य संजय मून, माजी प्राचार्य डी. बी. चौधरी, गुलशन पवार, प्राचार्य डॉ. पंडित नलावडे, प्राचार्य अन्वरसाब नेरगल, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,उपप्राचार्य रवी कुमार गोटेड,प्राचार्य डॉ. राजेश यादव, प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे,डॉ. एम आर खान, पंकज साबळे, जय सोने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा जिवरग यांनी केले. प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. बाबुरावजी काळे यांनी सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली. डॉ. दिलीप बिरुटे यांनी आप्पासाहेबांचा जीवनपट सादर केला. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रफुल देवरे यांनी उपस्थित मान्यवर, वक्ते, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, स्वर्गीय बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा आणि स्वातंत्र्यसेनानी उत्तमरावजी पाटील नर्सिंग कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील प्राध्यापक व यांचे आभार मानले या कार्यक्रमासाठी कर्मऱ्यांनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविकास आघाडीचा प्रचार 'भगवान' भरोसे, महायुतीत मात्र 'अलबेल'!

उमेदवारीवरून नाराजी, प्रचारातील विस्कळीतपणा अन् कार्यकर्त्यांची उदासीनता; पदवीधर मतदार तिसऱ्या पर्यायाच्या शोधात?

नरेश दंडवते

नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि म हायुती यांच्यात प्रमुख लढत होण्याची चिन्हे असली, तरी दोन्ही बाजूंच्या प्रचारयंत्रणेतील अंतर्गत विसंवाद, कार्यकर्त्यांची नाराजी आणि मतदारांपर्यंत पोहोचण्यातील मर्यादा यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. महाविकास आघाडीचा प्रचार राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवान आलेगावकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असला, तरी नियोजनाचा अभाव आणि मित्रपक्षांतील अस्वस्थतेमुळे आघाडीचा कारभार ङ्गभगवानङ्ख भरोसे असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दुसरीकडे, महायुतीच्या व्यासपीठावर नेते आणि पदाधिकारी दिसत असले, तरी प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्याच्या मोहिमेत अपेक्षित उत्साह जाणवत नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे दोन्ही प्रमुख आघाड्यांचे राजकीय गणित वरकरणी सरळ दिसत असले, तरी अंतर्गत पातळीवर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत.

महाविकास आघाडीत नियोजनाचा अभाव?

महाविकास आघाडीच्या प्रचाराची प्रमुख जबाबदारी भगवान आलेगावकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मात्र, पदवीधर म तदारसंघाच्या निवडणुकीचे स्वरूप, पदवीधरांचे प्रश्न, मतदार नोंदणीपासून प्रत्यक्ष मतदानापर्यंतची यंत्रणा आणि बूथनिहाय नियोजन या बाबींचा विचार करता प्रचार अधिक संघटित पद्धतीने होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात प्रचारात अपेक्षित समन्वय आणि आक्रमकता दिसत नसल्याची भावना काही कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

पदवीधर निवडणूक ही केवळ पक्षाच्या झेंड्यांवर किंवा नेत्यांच्या सभांवर जिंकता येत नाही. प्रत्येक मतदाराशी संपर्क, त्याच्या प्रश्नांची जाण, स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे आणि मतदानाच्या दिवशीची प्रभावी यंत्रणा या बाबी निर्णायक ठरतात. त्यामुळे प्रचाराची जबाबदारी स्वीकारलेल्या नेतृत्वाकडून अधिक नियोजनबद्ध कामाची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, हे नियोजन प्रत्यक्षात कितपत उतरले आहे, याबाबत राजकीय वर्तुळात प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

महेश देशमुख तरोडेकरांना डावलल्याची नाराजी

महाविकास आघाडीतील अस्वस्थतेचा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उमेदवारीचे राजकारण. काँग्रेसचे तरुण नेते महेश देशमुख तरोडेकर यांनी मागील दोन वर्षांपासून पदवीधर मतदारसंघाची तयारी केली होती. पदवीधरांची नावनोंदणी आणि मतदारांशी संपर्क साधण्याच्या कामात त्यांनी पुढाकार घेतल्याचे सांगितले जाते. त्यामुळे त्यांना उमेदवारीची संधी मिळेल, अशी अपेक्षा त्यांच्या समर्थकांना होती.

मात्र, ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्याने काँग्रेसमधील काही कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्याची चर्चा आहे. मित्रपक्षाच्या उमेदवाराला निवडून आणण्याची जबाबदारी काँग्रेसच्या स्थानिक यंत्रणेवर असली, तरी उमेदवारीच्या प्रक्रियेत आपल्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षांचा विचार झाला का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

राजकारणात उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सर्वांनी एकदिलाने काम करणे अपेक्षित असते. मात्र, उमेदवारीपूर्वीची मेहनत आणि उमेदवारीनंतरची जबाबदारी यांच्यात समन्वय साधण्यात अपयश आले, तर त्याचा परिणाम प्रचाराच्या गतीवर होऊ शकतो. महाविकास आघाडीसमोर सध्या हेच आव्हान असल्याचे चित्र आहे.

प्रदेशाध्यक्षांच्या नाराजीची चर्चा

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील प्रचाराच्या नियोजनावर नाराजी व्यक्त झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. प्रचाराची जबाबदारी सांभाळणाऱ्या स्थानिक नेतृत्वाकडून अपेक्षित समन्वय साधला जात नसल्याबाबत प्रदेश पातळीवर प्रश्न उपस्थित झाल्याचे बोलले जात आहे.

तथापि, या बैठकीत नेमकी कोणती भूमिका मांडण्यात आली, याबाबत अधिकृत पुष्टी उपलब्ध नसल्याने या चर्चांकडे राजकीय सूत्रांकडून समोर येणारी माहिती म्हणूनच पाहावे लागेल. मात्र, प्रदेश पातळीवरील नेतृत्वाला स्थानिक प्रचारयंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत स्पष्टीकरण द्यावे लागत असल्याची चर्चा खरी ठरल्यास, महाविकास आघाडीतील अंतर्गत समन्वयाचा प्रश्न अधिक गंभीर असल्याचे म ानले जाईल.

बेबीताई नाईक यांच्या छबीवरूनही नाराजी?

किनवटचे दिवंगत आमदार प्रदीप नाईक यांच्या पत्नी बेबीताई नाईक यांची प्रचार साहित्यावरील छबी प्रसिद्ध न केल्यावरून काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. मराठवाड्यातील राजकारणात स्थानिक नेत्यांचे योगदान, त्यांचे समर्थक आणि त्यांच्या कुटुंबीयांशी असलेले राजकीय संबंध यांना महत्त्व असते. त्यामुळे अशा बाबी वरकरणी किरकोळ वाटल्या, तरी त्यातून कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात.

प्रचार साहित्याच्या नियोजनात स्थानिक नेतृत्वाला योग्य स्थान मिळाले नाही, अशी भावना निर्माण झाल्यास त्याचा परिणाम संघटनात्मक एकजुटीवर होऊ शकतो. तुलसी कम्फर्ट येथे झालेल्या बैठकीत या मुद्द्यांसह जिल्ह्यातील प्रचाराच्या नियोजनावर चर्चा झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

या घडामोडींमुळे महाविकास आघाडीला अंतर्गत नाराजी दूर करून प्रचाराला एकसंध दिशा देण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

महायुतीत व्यासपीठ सजले; मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान!

महाविकास आघाडीतील नाराजीच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर महायुतीची स्थिती वरकरणी अधिक अनुकूल दिसत असली, तरी ते चित्र पूर्णपणे निर्विवाद नाही. भाजप आणि शिवसेनेचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचाराच्या व्यासपीठावर उपस्थित राहत असले, तरी त्याचे मतांमध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक असलेला व्यापक जनसंपर्क कितपत प्रभावी ठरतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने मागील तीन-चार दशकांत संघटनात्मक पातळीवर आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. काही निवडणुकांमध्ये यश मिळाले नसले, तरी पक्षाच्या उम ेदवारांनी लक्षणीय मते मिळवून स्पर्धेत आपले स्थान टिकवले होते. त्यामुळे भाजपच्या पारंपरिक मतदारांचा आणि कार्यकर्त्यांचा प्रभाव दुर्लक्षित करता येणार नाही.

मात्र, यंदाच्या निवडणुकीत पक्षीय सम ीकरणे बदलत असल्याची चर्चा आहे. उम ेदवाराच्या प्रचाराची जबाबदारी काही मोजक्या नेत्यांभोवती केंद्रित राहिल्यास अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता असते. महायुतीत उमेदवाराचे निकटवर्तीय जांभरुणकर यांच्याकडे प्रचाराची प्रमुख जबाबदारी असल्याची चर्चा असून, इतर कार्यकर्त्यांना पुरेशी भूमिका मिळत नसल्याची भावना काही स्तरांवर व्यक्त होत असल्याचे सांगितले जाते.

अर्थात, व्यासपीठावरील उपस्थिती आणि प्रत्यक्ष मतदानासाठी कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत या दोन वेगळ्या बाबी आहेत. महायुतीच्या नेत्यांना आता केवळ सभा, बैठका आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर समाधान न मानता पदवीधर मतदारांशी थेट संवाद वाढवावा लागणार आहे. अन्यथा संघटनात्मक ताकदीचा अपेक्षित लाभ मतपेटीत मिळेलच, असे नाही.

मित्रपक्षांतील समन्वयाची खरी कसोटी

महाविकास आघाडी असो वा महायुती, दोन्ही बाजूंना मित्रपक्षांमधील समन्वय टिकवणे ही प्रमुख गरज आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातील स्थानिक अपेक्षांचा मेळ घालणे आवश्यक आहे. त्याचवेळी जिल्ह्यातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणि तिचा प्रचारातील सहभाग कितपत प्रभावी ठरतो, यावरही आघाडीच्या कामगिरीचा काही अंशी परिणाम होऊ शकतो.

महायुतीमध्ये भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना समान महत्त्व देणे, स्थानिक नेतृत्वाला विश्वासात घेणे आणि प्रचाराची जबाबदारी सर्व स्तरांवर विभागणे आवश्यक आहे. एखाद्या नेत्याभोवती प्रचार यंत्रणा केंद्रित राहिल्यास संघटनेतील इतर घटक निष्क्रिय होण्याचा धोका असतो. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांनाही अंतर्गत समन्वयाची परीक्षा द्यावी लागणार आहे.

पदवीधर मतदार नाराजीचा फायदा कोणाला देणार?

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे पदवीधर मतदार हा केवळ पक्षनिष्ठेवर मतदान करणारा मतदार नसतो. रोजगार, बेरोजगारी, शिक्षणव्यवस्था, स्पर्धा परीक्षा, सरकारी नोकरभरती, महागाई आणि पदवीधरांच्या प्रश्नांवर उमेदवाराची भूमिका काय आहे, याचाही विचार केला जाऊ शकतो. त्यामुळे पक्षांतर्गत नाराजी आणि प्रचारातील विस्कळीतपणा यांचा परिणाम मतदारांच्या निर्णयावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दोन्ही प्रमुख आघाड्यांतील असंतुष्ट कार्यकर्ते आणि नाराज मतदार नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. ते आपल्या पक्षाच्या उम ेदवारासाठी शेवटपर्यंत काम करतात की पर्यायी उमेदवाराकडे वळतात, हे निवडणुकीच्या निकालाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते.

तिसऱ्या पर्यायाची चर्चा निर्माण होण्यासाठी केवळ प्रमुख पक्षांतील नाराजी पुरेशी नसते. त्या पर्यायाकडे मतदारांना आकर्षित करण्याची क्षमता, संघटनात्मक जाळे, विश्वासार्ह नेतृत्व आणि मतदानापर्यंत पोहोचण्याची यंत्रणा असणेही आवश्यक असते. त्यामुळे तिसरा पर्याय प्रत्यक्षात किती प्रभावी ठरतो, हे आगामी प्रचारावर अवलंबून राहणार आहे.

आता प्रतिष्ठेची लढाई!

एकीकडे महाविकास आघाडीसमोर ङ्गभगवानङ्ख आलेगावकर यांच्या नेतृत्वाखाली प्रचारयंत्रणा अधिक सक्षम करण्याचे, नाराज कार्यकर्त्यांना विश्वासात घेण्याचे आणि मि त्रपक्षांमधील समन्वय वाढवण्याचे आव्हान आहे. दुसरीकडे महायुतीला व्यासपीठावरील गर्दीचे रूपांतर मतदारांच्या सक्रिय सहभागात करावे लागणार आहे.

राजकीय गणिते, नेत्यांचे दावे आणि पक्षीय ताकद यापलीकडे जाऊन पदवीधर मतदारांशी थेट संपर्क साधणारा उमेदवारच आघाडी घेऊ शकतो. त्यामुळे ही निवडणूक केवळ दोन उमेदवारांमधील लढत राहिलेली नसून, पक्षांच्या स्थानिक नेतृत्वाची क्षमता, कार्यकर्त्यांची निष्ठा आणि प्रचारयंत्रणेच्या कार्यक्षमतेचीही परीक्षा ठरत आहे.

महाविकास आघाडीचा कारभार ङ्गभगवानङ्ख भरोसे असल्याची चर्चा आणि महायुतीत सर्व काही ङ्गअलबेलङ्ख असल्याचे वरकरणी दिसणारे चित्र यांमधून एक प्रश्न मात्र ठळकपणे पुढे येतो दोन्ही बाजूंच्या अंतर्गत राजकारणाचा फटका अखेर उमेदवारांना बसणार की पदवीधर मतदार या नाराजीला मतदानातून उत्तर देणार? याचे उत्तर आगामी प्रचाराची दिशा आणि मतपेटीतूनच स्पष्ट होईल.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

टॉर्च अन् मोबाईलच्या उजेडात आठवलेंची दुष्काळ पाहणी!

राणीसावरगाव (प्रतिनिधी): मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर असलेले केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रात्री उशिरा राणीसावरगाव येथे टॉर्च आणि मोबाईलच्या प्रकाशात शेतातील पिकांची पाहणी केली.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी रामदास आठवले सध्या दौऱ्यावर आहेत. धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर ते परभणी जिल्ह्यातील सेलू येथे पोहोचले. विविध ठिकाणी पाहणी करण्यात वेळ गेल्याने त्यांना राणीसावरगाव येथे पोहोचण्यास उशीर झाला. त्यामुळे शेतातील पिकांची पाहणी करताना अंधार पडला. अखेर टॉर्च आणि मोबाईलच्या प्रकाशात त्यांनी पिकांची स्थिती जाणून घेत

शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून, उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत पुरेशी नसल्याचे आठवले यांनी नमूद केले.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी किमान ५० ते ६० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव आर्थिक मदत मिळावी, यासाठी आपण मुख्यमंत्री यांची भेट घेणार असल्याचेही रामदास आठवले यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मिळणारी मदत, पिकांचे नुकसान आणि शासनाच्या उपाययोजनांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दुष्काळाची तीव्रता जाणून घेण्यासाठी सुरू झालेल्या दौऱ्यात राणीसावरगाव येथे पिकांची पाहणी चक्क टॉर्च आणि मोबाईलच्या उजेडात करावी लागली. एका बाजूला पिकांचे नुकसान, तर दुसरीकडे तुटपुंज्या मदतीमुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत आहेत. अशा परिस्थितीत वाढीव मदतीच्या मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पुर्णेत गावठी पिस्तुलसह मुद्देमाल जप्त

परभणी(प्रतिनिधी): पूर्णा शहरातील संत तुकाराम महाराज मंदिराजवळील मैदानात विनापरवाना गावठी पिस्तूल बाळगल्या प्रकरणी पूर्णा पोलिसांनी सहा जणांविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, अन्य पाच जण अंधाराचा फायदा घेऊन पळून गेल्याची माहिती पोलिसांतर्फे देण्यात आली. घटनास्थळावरून गावठी पिस्तूल, मोटारसायकल आणि तीन मोबाईल फोन असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.१७ रोजी मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास पूर्णा येथील संत तुकाराम महाराज मंदिराजवळील मैदानात ही घटना घडली. पाच जण विनापरवाना गावठी पिस्तूल बाळगून असल्याची तक्रार पोलिसांनी नोंदवली आहे.जिल्हाधिकाऱ्यांच्या शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचाही आरोप आहे. या कारवाईत सुमारे २० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल, ४५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल आणि तीन मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एक आरोपी अटक असून अन्य आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.याप्रकरणी पोलीस शिपाई चंद्रकांत पुदलवाड यांच्या फिर्यादी वरून पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

थोडक्यात महत्वाचे.....

नागेंद्र अनंतवार यांची बिनविरोध निवड

परभणी : हैद्राबाद येथील पद्मशाली भवनात झालेल्या अखिल भारतीय पद्मशाली संघमच्या वर्कींग कमिटीच्या बैठकीत उपाध्यक्षपदी नागेंद्र अनंतवार यांची निवड करण्यात आली. या बैठकीसाठी भारतातील १४ प्रांतातील पदाधिकारी व केंद्रीय सदस्य उपस्थित होते. मागील ५० वर्षापासून अविरत समाजसेवा व विविध संघटनेच्या माध्यमातून सामाजिक काम करणारे परभणी येथील जेष्ठ मार्गदर्शक व साई भक्त नागेंद्र अनंतवार यांची निवड झाल्याबद्दल संकुरवार, अशोकसेठ श्रीमनवार, बालाजी शातलवार, अनिल चरकपल्ली आदींसह मित्र परिवारांनी शुभेच्छा दिल्या.

पालममध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलन

पालम: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजयादशमीनिमित्त शनिवार दि. १७ रोजी पथसंचलन व शस्त्रपूजन करण्यात आले. यावेळी शहरातील प्रमुख रस्त्यांवरून स्वयंसेवकांनी संचलन केले. या उत्सवात शिस्त, संघभावना, राष्ट्रनिष्ठा आणि भारतीय संस्कृतीच्या परंपरांचे दर्शन घडले. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या संचलनामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.श्री खंडोबा मंदिरात आयोजीत कार्यक्रमात प्रमुख वक्ते विभागाचे प्रचार प्रमुख माणिकराव माटे, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अभियंता नागेशराव चौधरी उपस्थित होते. विजयादशमी हा शौर्य,पराक्रम आणि धर्मविजयाचे प्रतीक मानला जातो. यानिमित्ताने शस्त्रपूजन करून भारतीय संस्कृतीतील परंपरा आणि मूल्यांचे स्मरण करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या उपक्रमातून सामाजिक एकात्मता,संघटनशक्ती आणि राष्ट्राप्रती कर्तव्यभावनेचा संदेश देण्यात आला.

अरूणाताई काळे यांना पुरस्कार जाहीर

जिंतुर: तालुक्यातील दिवसाडी येथील रहिवासी तथा आडगाव बाजार येथील जिल्हा परिषद माजी सदस्या आणि समाजसेविका सौ. अरुणाताई अविनाश काळे यांना मराठवाडा सामाजिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने 'मराठवाडा भूषण २०२६' पुरस्कार जाहीर झाला आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. बुधवार, दि. २१ रोजी नाशिक येथील श्री सिद्धी बँक्वेट हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरफले आणि कामगार कल्याण आघाडीचे नाशिक जिल्हाध्यक्ष सूरज जावळे पाटील यांनी पत्राद्वारे ही माहिती दिली. पुरस्कार जाहीर झाल्याने आडगाव बाजारसह जिंतूर तालुक्यातून अरुणाताई काळे यांचे अभिनंदन होत आहे.

उपजिल्हाधिकारी लाहोटी यांनी घेतले देवीचे दर्शन

जिंतुर: उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांनी सहकुटुंब रीडज व भोगाव देवी या दोन्ही ठिकाणीयेथील जगदंबा देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन कुटुंबासह दर्शनाचा लाभ घेतला. तालुक्यातील रीडज येथील देवीचे धार्मिक महत्त्व असून, देवीच्या दर्शनासाठी परिसरातील तसेच दूरवरून भाविक येत असतात. श्रद्धा आणि भक्तिभावाने भाविक देवीच्या चरणी नतमस्तक होऊन दर्शन घेतात. याच पार्श्वभूमीवर सेलूचे उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांनी सहकुटुंब रीडज येथे भेट देत देवीचे दर्शन घेतले. यावेळी जिंतूर तहसीलचे नायब तहसीलदार प्रशांत राखे व मंडळ अधिकारी कदम, स्थानिक नागरिक व भाविकांची उपस्थिती होती. यावेळी जगदंबा देवी देवस्थान रिडजच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी जिल्ह्यात आले होते.सेलु तालुक्यातील वालुर येथील शेतकरी यांच्या शेतात भेट देऊन संवाद साधला. यावेळी रि.पा.इं. जिल्हाध्यक्ष डॉ.विजय गायकवाड, तहसीलदार शिवाजी मगर, गटविकास अधिकारी उदय जाधव तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

ग्राहकाला विमा रक्कम देण्याचे आदेश

परभणी(प्रतिनिधी): येथील कोहिनूर बँगल्स या बांगड्यांच्या दुकानाला आग लागून झालेल्या नुकसानी प्रकरणी दुकानमालकाला विमा दाव्याची रक्कम ९ टक्के व्याजासह अदा करण्याचे आदेश राज्य ग्राहक आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिले आहेत. तसेच मानसिक त्रासापोटी ५० हजार रुपये देण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत.

या प्रकरणातील तक्रारदार शकील हाजी इरफान खान हे परभणीतील बसस्थानक रोडवरील कोहिनूर बँगल्सचे मालक आहेत. त्यांच्या दुकानाला १७ ऑगस्ट २०१५ रोजी आग लागून नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी त्यांनी ५० लाख रुपयांचा विमा दावा मिळावा, यासाठी भारतीय स्टेट बँक आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांच्याविरुद्ध राज्य ग्राहक आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात तक्रार दाखल केली होती. विमा हप्त्यापोटी दिलेले धनादेश न वटल्यामुळे विमा पॉलिसी अस्तित्वात नव्हती, अशी भूमिका घेत विमा कंपनीने दावा नाकारला होता. तक्रारदाराने स्टेट बँकेच्या कॅश क्रेडिट खात्यातून धनादेश दिला होता. मात्र, बँकेने कर्जाची संपूर्ण मर्यादा वापरली गेल्याचे कारण देत अतिरिक्त ओव्हरड्राफ्ट सुविधा न देता धनादेश परत केला. या संदर्भातील माहिती दुकानाला आग लागल्यानंतर विमा दावा दाखल करेपर्यंत तक्रारदाराला कळविण्यात आली नसल्याचा मुद्दा आयोगासमोर मांडण्यात आला. विमा दावा नाकारण्यात आल्याने तक्रारदाराने नुकसान भरपाई आणि विमा रक्कम मिळण्यासाठी ग्राहक आयोगात धाव घेतली. या प्रकरणात ॲड. सतीश देशपांडे यांच्यामार्फत तक्रार दाखल करण्यात आली होती. अंतिम सुनावणीच्या वेळी ॲड. प्रविण नं.कालानी यांनी तक्रारदाराची बाजू मांडताना सेवेत झालेल्या त्रुटींचा मुद्दा उपस्थित केला. विमा कंपनीच्या सर्वेयरनेही आपल्या अहवालात ३५ लाख ७५ हजार ७३५ रुपयांचे नुकसान झाल्याचे नमूद केले होते.

राजे संभाजी मित्र मंडळाच्या सार्वजनिक नवरात्र महोत्सवात परभणीचे प्रथम महापौर प्रताप देशमुख यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी विजय जाधव, श्याम कदम, संतोष कांबळे, सचिन यंदे, रमेश राऊत,किरण सुर्यवंशी, उदय गिरी, अशोक कांबळे, अरुण जाधव, सचिन मोटे, राजू मस्के आदी.

डिजीटल अरेस्ट प्रकरणातील आंतरराज्यीय टोळी ताब्यात

परभणी (प्रतिनिधी): निवृत्त प्राध्यापकाला 'डिजिटल अरेस्ट' आणि मनी लाँड्रिंगची भीती दाखवून तब्बल १ कोटी ११ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारांच्या टोळीचा परभणी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सायबर पोलीस ठाण्याने तांत्रिक तपासाच्या आधारे पाच आरोपींना टप्प्याटप्प्याने अटक केली असून, त्यांच्या खात्यांमधील २३ लाख रुपये फ्रीज केले आहेत. तसेच गुन्ह्यात वापरलेले १० मोबाईल, २३ कार्ड, १८ सिमकार्ड आणि ३३ हजार रुपये रोख असा एकूण ५ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परभणी येथील एका निवृत्त प्राध्यापकाला सायबर गुन्हेगारांनी व्हॉट्सप व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. दिल्ली पोलीस, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि दहशतवादविरोधी पथकाचे (एटीएस) अधिकारी असल्याचे भासवून त्यांच्या आधार कार्डचा वापर करून दहशतवाद्यांनी बँक खाती उघडल्याचा बनाव करण्यात आला. त्यानंतर मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्यात अडकविण्याची आणि डिजिटल अरेस्ट करण्याची भीती दाखवून त्यांच्याकडून विविध बँक खात्यांमध्ये एकूण १ कोटी ११ हजार रुपये जमा करून घेण्यात आले. याप्रकरणी नवामोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम व त्यांच्या पथकाने केला.तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्ह्यातील पैशांच्या व्यवहारांचा मागोवा घेताना बँक खात्यांच्या पहिल्या ते अकराव्या स्तरापर्यंतच्या साखळीचा सखोल अभ्यास करण्यात आला.या तपासातून विविध राज्यांत कार्यरत असलेल्या टोळीतील प्रमुख सूत्रधार,तांत्रिक मदत करणारे आणि बँक खाती उपलब्ध करून देणारे आरोपी निष्पन्न झाले.

या प्रकरणात तळोजा, नवी मुंबई येथील एका महिला आरोपीसह आफताब अब्दुल पठाण, तौफिक उर्फ बिल्ला इनायतउल्ला पटेल, गुरप्रीत सिंग जगजीत सिंग आणि साहिल बालकृष्ण कटारिया या पाच आरोपींना टप्प्याटप्प्याने ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींकडून विविध बँकांची १९ एटीएम/डेबिट कार्डे, एक क्रेडिट कार्ड, तीन कॉर्पोरेट कार्डे, बँक खात्यांशी संलग्न १८ सिमकार्ड, १० अँड्रॉइड मोबाईल आणि ३३ हजार रुपये रोख असा एकूण ५ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या विविध बँक खात्यांतील २३ लाख रुपये फ्रीज करण्यात आले आहेत.या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

राणीसावरगाव(प्रतिनिधी) : गुंजेगाव येथील जि.प. शाळेत स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार दीपक जम्बुरे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, महिला व मुलींचे संरक्षण, वाहतूक नियम आणि कायद्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.ऑनलाइन फसवणूक व डिजिटल अरेस्टच्या वाढत्या प्रकारांबाबत विद्यार्थ्यांना सतर्क करून आर्थिक सायबर फसवणूक झाल्यास १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय व क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच सायबर सुरक्षा प्रतिज्ञाही देण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक टी. एस. आचणे, पीएसआय आंधोरीकर, पोलीस अमलदार विलास शिंगारे, शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.सुत्रसंचलन एम. बी. ढगे यांनी तर एस. एस. बुके यांनी आभार मानले.

परभणी तालुक्यातील इंद्रायणी देवीच्या माळावर नवरात्रोत्सवानिमित्त कुस्तींच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी लहान वयोगटापासुन मोठ्या वयोगटातील कुस्त्यांची थरारक अशी दंगल पाहण्यास मिळाली. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण रूग्णालयात १४ बालकांवर लघुशस्त्रक्रिया

जिंतुर (प्रतिनिधी): राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रममंतर्गत ग्रामीण रुग्णालय येथे आयोजित विशेष शस्त्रक्रिया शिबिरात वाचादोष (टंग टाय) असलेल्या १४ बालकांवर यशस्वी लघुशस्त्रक्रिया करण्यात आल्या.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करताना पथकाने वाचादोष असलेल्या बालकांची निवड केली होती. त्यानुसार शुक्रवार, दि.१६ रोजी ग्रामीण रुग्णालय येथे विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश लखमांवार यांच्या आदेशानुसार हे शिबिर आयोजित करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संजय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली

शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात ईएनटी तज्ज्ञ डॉ. तेजस तांबोळी यांनी १४ बालकांवर लघुशस्त्रक्रिया केल्या. भूलतज्ज्ञ डॉ. दीपा परिहार यांनी भूलतज्ज्ञ म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बालकांची आरोग्य तपासणी केली. यशस्वीतेसाठी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका व कर्मचारी तसेच पथकातील डॉ. अर्चना भायेकर, डॉ. प्रशांत बामणे, डॉ. अंकिता गौतम, डॉ. शुभम गंगासागर, आरोग्य सेविका स्वाती गिरी, सारिका जाधव, पीएचए अनिल सावंत, समीर दरगु, दत्तात्रय कौटकर आणि विजय ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

परभणीत पहिल्या यशस्वी किडनी प्रत्यारोपनानंतर रूग्णाला डिस्चार्ज

पत्नीने पतीला किडनी दान करून दिले जीवदान, खा. संजय जाधव यांनी रूग्णालयात भेट देत दिल्या शुभेच्छा, डॉक्टरांचे मानले आभार

परभणी (प्रतिनिधी): शहरातील शिवनेरी सुपर स्पेशालिटी व सूर्या आयसीयू हॉस्पिटल येथे यशस्वी किडनी प्रत्यारोपण करण्यात आले असून, उपचारानंतर रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्याने शनिवार, दि.१७ रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. विशेष म्हणजे, पत्नीने स्वतःची एक किडनी पतीला दान करून त्यांना नवजीवन दिले. परभणीतील या वैद्यकीय कामगिरीचे महत्त्व अधोरेखित होत असताना खा.संजय जाधव यांनी रुग्णालयात उपस्थित राहून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या.

पाथरी तालुक्यातील पाथरगव्हाण येथील रहिवासी भारत गणेशराव घांडगे (४८) हे गेल्या सहा महिन्यांपासून मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त होते. त्यांची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाल्याने त्यांना नियमित डायलिसिस करावे लागत होते. वारंवार उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला होता. या कठीण परिस्थितीतून पतीला बाहेर काढण्यासाठी त्यांच्या पत्नी सीमा भारत घांडगे (४५) यांनी स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला.

शिवनेरी सुपर स्पेशालिटी व सूर्या आयसीयू हॉस्पिटलमधील

तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने २६ सप्टेंबर रोजी किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण आणि किडनी दान करणाऱ्या त्यांच्या पत्नी या दोघांच्याही प्रकृतीवर डॉक्टरांनी बारकाईने लक्ष ठेवले. उपचारांना चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर दोघांचीही प्रकृती स्थिर झाली आणि त्यांना रुग्णालयातून घरी जाण्याची परवानगी देण्यात आली. या यशस्वी किडनी प्रत्यारोपणामध्ये डॉ. राजीव राठोड (युरो सर्जन), डॉ. संतोष समिते (युरो सर्जन), डॉ. राहुल भास्करराव टेंगसे (ट्रान्सप्लांट फिजिशियन), डॉ. भृती शहारे (भूलतज्ज्ञ), डॉ. संजय खिल्लारे, डॉ. गोविंद पावडे, डॉ. पूजा रा. टेंगसे-खुपसे, डॉ. निनाद सूर्यतळे आणि डॉ. इम्रान हाश्मी (क्रिटिकल केअर टीम) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच ॲड.सुजित आवटी (लीगल ॲडव्हायझर), विनोद डावरे (अवयवदान समन्वयक), रुग्णालयातील नर्सिंग स्टाफ, डायलिसिस विभागातील तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांनीही या प्रक्रियेत योगदान दिले. सर्वांच्या समन्वयातून प्रत्यारोपणाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.

किडनी प्रत्यारोपणानंतर आवश्यक असलेल्या इम्युनोसप्रेसिव्ह औषधांसाठी आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मदत उपलब्ध झाल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली. प्रत्यारोपित किडनी शरीराने स्वीकारण्यासाठी ही औषधे महत्त्वाची असतात. योजनेच्या माध्यमातून औषधोपचारासाठी मदत मिळाल्याने रुग्णाला आर्थिक दिलासा मिळण्यास मदत झाली. या यशस्वी प्रत्यारोपणानंतर खासदार संजय जाधव यांनी रुग्णालयात भेट देऊन भारत घांदगे, सीमा घांदगे आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रत्यारोपण यशस्वी करणाऱ्या डॉक्टरांच्या पथकाचे कौतुक केले.

मनपा संघटनेच्या अध्यक्षपदी नासेर खान यांची निवड

परभणी (प्रतिनिधी): मनपा अधिकारी-कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी नासेर खान वहिद खान यांची पुन्हा एकदा बिनविरोध निवड करण्यात आली. मनपा अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या सर्वसाधारण सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली.

परभणी महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदाच्या निवडीचा विषय चर्चेला आला. यावेळी नासेर खान वहिद खान यांच्या नावावर उपस्थितांनी एकमत दर्शविले.त्यांच्या नावाला विरोध न झाल्याने त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध पुनर्निवड करण्यात आली. या पुनर्निवडीमुळे कर्मचारी- अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे आवाज उठविण्यास तसेच प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करण्यास बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवड बैठकीस संघटनेचे संस्थापक अध्यक्ष के.के.आंधळे, सफाई कर्मचारी कामगार संघटनेच्या अध्यक्षा अनुसयाबाई जोगदंड, सचिव के. के. भारसाखळे तसेच महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे उपाध्यक्ष अभिजीत कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी उपाध्यक्षपदी विनय ठाकूर, कोषाध्यक्षपदी मोईन खान, सचिवपदी विशाल उपाडे, कार्याध्यक्षपदी मनोज तळेकर, तर प्रसिद्धीप्रमुखपदी राजचप्पा बिराजदार यांचा समावेश आहे.

पाणी वापराच्या काटकसरीबाबत गावांमध्ये जनजागृती करा- पालकमंत्री

जिल्ह्यातील पाणी, चारा नियोजनाबाबत आढावा बैठकीत सूचना

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

अल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानात घट झाली आहे. संपूर्ण हिंगोली जिल्ह्यात शासनाने दुष्काळ सदृश परिस्थिती जाहीर केली आहे. या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी कालावधीत संभाव्य पाणी, चारा टंचाईच्या अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करा. प्रत्येक गावागावात पाणी वापराच्या काटकसरीबाबत व्यापकप्रमाणात जनजागृती करा, अशा सूचना राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्हा प्रशासनास केल्या.

पालकमंत्री झिरवाळ यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील पाणी, चारा आदींचा आढावा घेतला. झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड,पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतचे कार्यकारी अभियंता आर.पी. गरुड, जिल्हा जलसंधारण अधिकारी सोनाली ढोके, हिंगोली नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रांजली मुंडे, जिल्हा परिषदेचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे राजू नरवाडे आदींची उपस्थिती होती. यांसह उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता सुधाकर कचकलवार, जिल्ह्यातील इतर सर्व मुख्याधिकारी ऑनलाइन उपस्थित होते. पालकमंत्री झिरवाळ म्हणाले, संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठ्याचे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत प्राधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करावे. पिण्याच्या पाण्यीच सुनिश्चितता करून योग्य ती अंमलबजावणी करावी, जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांतील उपलब्ध जलसाठ्याचे सन २०२६-२७ या वर्षातील धरणनिहाय, वापरनिहाय पाणी वापर नियोजन निकषानुसार अंतिम करावे.

प्रत्येक प्रमुख जलाशयाच्या उपलब्ध जिवंत साठ्यापैकी १० टक्के अतिरिक्त बफर, आपत्कालीन साठा राखून ठेवणे, नागरी, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पाणी वापरात १० टक्के कपात करणे, गळती प्रतिबंधक मोहीम राबविणे, सांडपाणी पुनर्वापर, औद्योगिक वापरासाठी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर, पिण्याचे पाणी, औद्योगिक आरक्षणानंतर शिल्लक पाण्यानुसार रब्बी हंगामी पिके, चारा पिकांसाठी सिंचन पाळी, आर्वतनाचे वेळापत्रक निश्चित करणे आदी बाबींचाही आढावा पालकमंत्री झिरवाळ यांनी घेऊन योग्य त्या सूचना केल्या.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती पालकमंत्री झिरवाळ यांना सादरीकरणाद्वारे दिली. जिल्ह्यातील पाणी पातळीतील घट, प्रकल्पातील पाणी साठा, पाणी वापराचे नियोजन, अवैध पाणी उपशांवर केलेली कारवाई, दुष्काळाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी, चारा उपलब्धता आणि वैरण विकासाबाबतच्या उपाययोजना, जलसंवर्धन, जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येणारी कामे, जिल्ह्यात निर्माण करण्यात येणारी ३० हजार जलतारा प्रकल्पसाठे यांसह पाणी वापर आणि काटकसरीबाबत केलेल्या उपाययोजनांचीही माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनीही जिल्ह्यातील एकूण पाणी परिस्थितीचा सविस्तर आढावा सादर केला.

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून नियोजनबध्द अभ्यास करावा- गुप्ता

तोष्णीवाल महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

सेनगाव येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत जीवनात यशस्वी होण्यासाठी निश्चित ध्येय आणि नियोजनबद्ध अभ्यास आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्पचे अध्यक्ष बी. आर. तोष्णीवाल होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष सुभाषअप्पा एकसिंगे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रमणजी तोष्णीवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. ए. जोशी, कार्यक्रम समन्वयक डॉ. आर. एस. गोरे, पालक प्रतिनिधी शंकरराव तुकाराम नानवटी व प्रतिभा लिंबाजी कदम उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. तळणीकर यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रम, सामाजिक उपक्रम तसेच सनदी व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांची माहिती दिली. प्रा. टी. यू. केंद्रे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांच्याशी संवाद साधला. जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करून त्यानुसार अभ्यासाचे नियोजन करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना संबंधित परीक्षेचा अभ्यासक्रम समजून घ्यावा आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा योग्य वापर करावा. उपलब्ध पुस्तके व अभ्याससाहित्याच्या मदतीने नियोजनबद्ध अभ्यास केल्यास ध्येय गाठणे सोपे होते. बदलत्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी संगणक प्रोग्रामिंग सारखी कौशल्येही आत्मसात करावीत, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात बी. आर. तोष्णीवाल यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे महाविद्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ पोलीस भरतीपुरते मर्यादित न राहता भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) आणि भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) यांसारख्या उच्च पदांचे ध्येय ठेवून महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षांची तयारी करावी. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत जागरूक राहून त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. दत्ता सावंत यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. शंकर पजई यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

हिंगोलीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे थाटात पथसंचलन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

राष्ट्रीयस्वयंसेवकसंघाच्यावतीने दि १८ ऑक्टोबर रोजी येथील भारतीय विद्या मंदिर शाळेच्या मैदानावर विजया दशमी उत्सव व पथसंचलानचे आयोजन करण्यात आले होते. या पथसंचलनात उत्स्फूर्तपणे स्वयंसेवकांनी सहभाग धेतला होता. शहरातील प्रमुख मार्गावरून स्वयंसेवकांचे पथसंचलन थाटात पार पडले.

विजयादशमीच्या मुहूर्तावर आपल्या हिंदू समाजामध्ये पराक्रम व शक्ती जागरणाची परंपरा आहे. संघाचा व्यक्ती निर्माणाचा हा प्रवास शतकोत्तर पोहोचला आहे. आपल्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नती होऊन आपल्या भारतमातेला परमवैभव प्राप्त व्हावे या दिशेने ही वाटचाल सुरु असल्याचे संघाच्या वतीने सांगण्यात आले आहे. येथील भारतीय विद्या मंदिर शाळेपासून निघालेल्या पथसंचलनाचे शहरातील विविध मार्गावयन मार्गक्रमण करीत असतांना पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांनी प्रात्यक्षिके सादर केली.

सायंकाळी सहा वाजता शाळेच्या प्रांगणात प्रमुख वक्ते म्हणून देवगिरी प्रांताचे सहप्रांत प्रचारक राजेंद्र कोळपे हे मार्गदर्शन केले तर प्रमुख अतिथी म्हणून सनदी लेखापाल सीए राजेश सोमाणी यांची उपस्थिती होती. यावेळी स्वयंसेवकांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हिंगोली- येथील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने रविवारी मुले आणि मुलींची भव्य मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने तरूण-तरूणांनी या रॅलीत सहभाग नोंदविला. यांप्रसंगी अभियंता अशोक अग्रवाल, अमित रूहीटीया यांच्यासह समितीचे सदस्य. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

सांदीपनीचा प्रसाद कुलकर्णींचे यश

हिंगोली- सांदीपनी पब्लिक स्कूल तरोडा बुद्रुक नांदेड येथील शाळेने नुकतेच यश संपन्न केले आहे. महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा प्रकारात ४०० मीटर पोहणे यशंतीत गोल्ड मेडल व २०० मीटर फ्रीस्टाइल सिल्वर मेडल मिळवून सांदीपनी शाळेतील प्रसाद चंद्रकांत कुलकर्णी या विद्यार्थ्याने शाळेचे नाव विभागीय स्तरावर नेले आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी शाळेचे सहसंचाल मुकुल राठोड, उपमुख्याध्यापिका सौ हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, क्रीडा शिक्षक गणपत या सर्वांनी प्रसाद कुलकर्णी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. प्रसाद कुलकर्णी या विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्तरावर झाली आहे व तो नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरीत

हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने सांस्कृतिक स्पर्धेतील नृत्य व आदर्श कुटूंब स्पर्धा घेण्यात आली. नृत्य स्पर्धेतील खुल्या गटात गरबा ग्रुपला विजेते पद तर आदर्श कुटूंब स्पर्धेत प्रियंका गजानन देशमुख या कुटूंबाला पहिला क्रमांक मिळाला आहे. सांस्कृतिक स्पर्धेतील गायन, भजन, नृत्य व आदर्श कुटूंब स्पर्धेतील विजेत्यांना रविवार दि.१८ ऑक्टोबर रोजी बक्षीस वितरण करण्यात आले. सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या हॉटेल शिवलिला सभागृहात बुधवार दि. १४ ऑक्टोबर रोजी आदर्श कुटूंब स्पर्धा संपन्न झाली. नृत्य स्पर्धा शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली. या दोन्ही स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नृत्य स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलता गोमासे-जगताप, सेवानिवृत्त तहसीलदार मधुकर खंडागळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. आदर्श कुटूंब स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्रियंका गजानन देशमुख, द्वितीय सुहानी नितीन खिल्लारे, तृतिय प्रगती जितेंद्र जाधवन तर उत्तेजनार्थ मंदाकिनी भगवान चव्हाण, कुंता नागनाथ लोखंडे, संजिवनी गणेश मस्के यांनी यश संपादन केले. नृत्य स्पर्धेमध्ये खुल्या गटात प्रथम क्रमांक गरबा ग्रुप, द्वितीय महाभारत, तृतिय तांडव ग्रुप तर उत्तेजनार्थ पारितोषिक एसएमडी श्री गणेशा ग्रुप यांना यश संपादन केले. बालगट सोले डान्स प्रथम पारितोषिक श्रुनया विडोळकर, द्वितीय रियांशी बोरकर, तृतिय स्वरा चोपडे, शिवन्या गडाळे तर उत्तेजनार्थ कु.गरवारे. मोठया गटात प्रथम श्रावणी देशमुख, द्वितीय अक्षरा कदम, तृतिय तनया भगत, मंदा होडबे हे विजेते ठरले. परिक्षक म्हणुन आकाश खंदारे, संध्या वरुडकर यांनी काम पाहिले.

खा. रामराव वडकुतेंच्या हस्ते बुध्दीबळ स्पर्धेचे उद्‌घाटन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन शिवाजीराव देशमुख सभागृह येथे पार पडले. राज्यसभा सदस्य खासदार रामराव वडकुते यांच्या हस्ते आणि प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत हिंगोली जिल्ह्यातील शेकडो बुद्धिबळपटूंनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. यांप्रसंगी आयोजित उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी समाधान घुटकुळे यांच्यासह रजनीश पुरोहित, प्रणव पांडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजकांच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.

ही स्पर्धा १७ वर्षांखालील, ११ वर्षांखालील (मुले व मुली) आणि खुला गट अशा तीन वेगवेगळ्या गटांमध्ये खेळवली जात आहे. जिल्ह्यातील लहान मुलांपासून ते ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत सर्वांनीच या स्पर्धेला मोठा प्रतिसाद दिला आहे. या उद्घाटन प्रसंगी जिल्हा चेस असोसिएशनचे अध्यक्ष विलास गोरे, संजय पवार, विश्वास बांगर, शरद वाघमारे, राजू शेट्टी, नेपाल सिंह ठाकूर, सुरज बेले, सोपान कुटे यांच्यासह बुद्धिबळ क्षेत्रातील अनेक मान्यवर, क्रीडाप्रेमी, खेळाडू आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुलीवर अत्याचार करणाऱ्या पित्याला नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम जन्मदात्या पित्याला जिल्हा न्यायालयाने नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म सश्रम कारावासाची आणि १ लाख २ हजार रूपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांनी शनिवारी हा महत्वपूर्ण निकाल दिला असून न्यायालयाने पिडीत मुलीला मनोधैर्य योजनेंतर्गत ५ लाखांची आर्थिक मदत देण्याचेही निर्देश दिले आहेत.

याबाबत सरकारी वकील ॲड एन एस मुटकुळे यांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली जिल्ह्यातील एका पिडीत अल्पवयीन मुलीने दि २९ एप्रिल २०२३ रोजी तक्रार दिली. फिर्यादीनुसार दि १८ एप्रिल २०२३ ते २० एप्रिल २०२३ दरम्यान तिच्या वडीलांनी तिला गुलाबजामुन, भेळ आणि कलाकंदमधून गुंगीचे औषध दिले. त्यामुळे तिला गुंगी आर्लयावर आणि ती अर्धवट झोपेत असतांना आरोपी वडीलांनी तिच्यासोबत छेडछाड केली. त्यानंतर दि २२ एप्रिल २०२३ रोजी रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास आरोपीने पिडभत मुलीचे दोन्ही हात ओढणीने बांधून तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. या घटनेबाबत कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन तिला चापट बुक्क्यांनी मारहाणही केली. पिडीतेच्या तक्रारीवरून संबंधित पोलिस ठाण्यात पित्याविरूध्द विविध कलमासह गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात उपनिरीक्षक श्रीमती श्रीदेवी वग्गे यांनी तपास करून जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले. प्रकरणात १२ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडीत मुलीची साक्ष महत्वाची ठरली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने आरोपी पित्याला नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली. सरकार पक्षातर्फे ॲड एनस एस मुटकुळे यांनी काम पाहीले. त्यांना सहायक सरकारी वकील ॲड एस डी कुटे, सविला देशमुख यांनी सहकार्य केले. कोर्ट पैरवी प्रमोद मार्कड यांनी केली.

डोंगरकडा, फाळेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

जिल्ह्यातील डोंगरकडा आणि फाळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय स्तरावरील बाह्य मूल्यांकनात डोंगरकडा आरोग्य केंद्राला ९३.५१ टक्के, तर फाळेगाव आरोग्य केंद्राला ९५.४१ टक्के गुण मिळाले आहेत.

राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्राने १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे या मानांकनाची पुष्टी केली आहे. दोन्ही आरोग्य केंद्रांतील सहा विभागांचे मूल्यांकन करण्यात आले. निर्धारित गुणवत्ता निकष पूर्ण केल्यामुळे या केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. आरोग्य सेवांची गुणवत्ता, स्वच्छता आणि व्यवस्थापनाचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्य विभागाने केलेल्या प्रयत्नांना या यशामुळे मान्यता मिळाली आहे. या प्रक्रियेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी सांगितले. मानांकन प्राप्त आरोग्य केंद्रांनी मूल्यांकनात सुचविलेल्या सुधारणांवर कार्यवाही करून कृती आराखडा सादर करणे आवश्यक आहे. तसेच, आरोग्य सेवांचा दर्जा कायम राखण्यासाठी नियमित देखरेख आणि संनियंत्रण लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आरोग्य विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले असल्याचेही डॉ. शेळके यांनी सांगितले.

मुख्य रस्त्यावर वाहने उभी केल्यामुळे दसरा महोत्सव प्रवेशद्वाराजवळ वाहतुक कोंडी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ ऑक्टोबर

येथील रामलीला मैदानावर सध्या दसरा महोत्सव धुमधडाक्यात सुरू असून, या महोत्सवाला नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, महोत्सवासाठी येणाऱ्या नागरिकांनी आपली चारचाकी व इतर वाहने पार्किंगऐवजी थेट मुख्य रस्त्याच्या बाजूला उभी केल्याने वाहतुकीस प्रचंड अडथळा निर्माण होत आहे.

मुख्य रस्त्यावर अस्ताव्यस्त पार्किंग: रामलीला मैदानाबाहेर मुख्य रस्त्यावरच चारचाकी वाहने उभी केली जात असल्याने इतर वाहनधारकांना ये-जा करणे कठीण झाले आहे. पोलीस ठाण्याच्या मुख्य प्रवेशद्वारावरच (मेन गेटवर) वाहने पार्क केली जात असून, प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण होत आहे. अत्यंत संवेदनशील आणि आपत्कालीन सेवा असलेल्या अग्निशामक दल केंद्राच्या समोरच वाहने उभी केली जात आहेत. एखादी दुर्घटना किंवा आपत्कालीन प्रसंग घडल्यास अग्निशामक गाड्या बाहेर पडणे कठीण होऊन मोठा अनर्थ घडू शकतो. दसरा महोत्सव समिती आणि पोलीस प्रशासनाच्या वाहतूक शाखेने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन योग्य पार्किंगची व्यवस्था करावी व रस्त्यावरील अस्ताव्यस्त पार्किंगवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.

आदमपूरात पाण्यासाठी तीन कोटी रुपयांचा चुराडा

तभा वृतसेवा
आदमपूर, दि. १७ ऑक्टोबर -

बिलोली तालुक्यातील ग्राम आदम पूर गावात पाणीपुरवठ्यासाठी मुख्यमंत्री पेयजल योजना व जलजीवन योजने अंतर्गत कमीत कमी तीन कोटी रुपयांचा निधी पदरात पडला.मात्र,अवाढव्य निधी खर्च झाल्यानंतरही संबंधित गावातील पाणीटंचाई कायम अजुनही 'जैसे थे' अशीच कायम आहे.पाण्याची समस्या गंभीर बनली असताना शेतकऱ्यांच्या इंधन विहिरींचे अधिग्रहण व टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत व तालुका,जिल्हा प्रशासनाकडून भक्कम कार्यवाही होत नसल्याच सद्यस्थितीत वास्तव चित्र आहे.

सदरील योजनेचा बट्ट्याबोळ व मिशनचे कामही अर्धवट करून सोडणाऱ्या संजीवनी कन्स्ट्रक्शन नांदेड ला काळ्या यादीत टाकावे. गाव परिसरात मन्याड नदीत विहिर बांधून तयार आहे,परंतु तेथे स्वीच रूम आणि पादचारी उडाणपूल उपलब्ध नाही. पाईपलाईन गावापर्यंत आहे,

मात्र पाण्याच्या टाकीला व पाणीपुरवठा विहीरीला जोडण्यात आली नाही.ग्राम पंचायत सदस्य तथा पत्रकार गंगाधर पंगलवार यांनी वारंवार निवेदन व वृत्तपत्रातून बातमी देऊनही सदरील योजनेत

काहीच हालचाल दिसून येत नाही.परिणामी,गावात महिन्यातून केवळ एक-दोन वेळाच नळाला पाणी येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. एका बाजूला पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधींचा निधी खर्च झाल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे गावकऱ्यांची तहान भागत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित प्रशासनाने किमान दोन शेतकऱ्यांच्या इंधन विहिरी तातडीने अधिग्रहित कराव्यात व टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करून आदमपूरचा पाणीप्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ पाणीटंचाई दूर करण्यासाठी ग्रामपंचायतीने शेतकऱ्यांच्या इंधन विहिरी अधिग्रहित करण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत.मात्र, तालुकास्तरीय,जिल्हास्तरीय प्रशासनाकडून त्यावर निर्णय होत नसल्याने पाणीपुरवठ्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.सध्या रब्बी पेरणीचे दिवस असतानाच शेतकरी आणि नागरिकांना पिण्याच्या तसेच दैनंदिन वापराच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने गावकऱ्यांकडून तीव्र संताप व्यक्त होताना दिसून येत आहे.

शहरी भागासह ग्रामिण भागातील अवैध धंदे , समुळ नष्ट करणार :पो. नि. अरविंद घोडके

तभा वृतसेवा
लोहा, दि. १७ ऑक्टोबर -

दुर्गा उत्सव, दसरा,धम्मचक्र परिवर्तन दिन, धार्मिक आगामी सण शांततेच्या उत्सावात पार पडावेत, यासाठी स्थानिक स्तरावर पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असते. या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सार्वजनिक ठिकाणी शांतता कायम ठेवणे आणि अवैध धंद्यांना आळा घालणे ही पोलिसांची प्रमुख जबाबदारी असते. अवैध व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक नांदेड़ यांच्या आदेशाने व उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक अरविंद घोडके यानी अवैध धंद्याला चाप लावुन आळा घातला असुन अवैध धंद्याकडे न वळता तरुणाने आदर्श जिवन जगावे ,अवैध धंद्याच्या अहारी जाऊन आयुष बर्बाद करुन घेऊ नये असे आवाहन पोलीस निरीक्षक अरविंद घोडके यांनी केले.

ग्रामिण भागातील पोखरभोसी सारख्या गावात अवैध धंद्यानी विळखा घेतला होता,या भागातील अवैध धंदे समुळ नष्ट केले, राष्ट्रीय सणांच्या काळात मोठ्या प्रमाणावर देवी,देवतेच्या ठिकाणी भाविकांची गर्दी होत आसते. मागील काळात गणेश मंडळांचे कार्यक्रम, दुर्गामाता मंडळांचे धार्मिक सोहळे,दोन तीन दिवशा नतर दुर्गा उत्सवाच्या मिरवणुकीची गर्दी आणि दसरा,धम्मचक्र परिवर्तन दिनी सार्वजनिक कार्येक्रमाचे आयोजन करण्यात येत आसते,या उत्सवामुळे ग्रामीण भागातील तरुणाईची शहरात रेलचेल वाढत आसते. अशा परिस्थितीत अवैध दारू विक्री,गांजा , गुटखा ,जुगार, मटका तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागाचे काटेकोरपणे नियोजन करण्यात येत असते. शहरात दररोज पोलिस कर्मच्या-यांची गस्त वाढवून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जात असते. अशा वेळी जर कोणी कायद्याचे उल्लंघन करेल त्याची गय केली जात नाही या साठी तरुणाईने जबाबदारीन उत्सव साजरे करावेत

अवैध धंद्यांमुळे सामाजिक वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता असते. विशेषतः सण-उत्सवांच्या काळात अशा व्यवसायांना आळा बसल्यास नागरिकांना सुरक्षित वातावरणात धार्मिक कार्यक्रम साजरे करता येतात.यासाठी गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे ए.एस. आय. सदाशिव जामकर,परसराम लुंगारे पोलिस तपास यंत्रनेचे कर्मचारी, संशयित ठिकाणांची तपासणी करतात.या काळात वाहातुकिसाठी अड़चन येऊ नये म्हणुन ट्राफिक पोलिस कर्मच्या-यासारखे, रोडवर पोलिस कर्मच्या-याला तैनात करण्यात आले आहे , गस्तीवर आसलेला पोलिस कर्मचारी वाहान चालकाना शिस्तीचा उपदेश करुन आपल्या वाहानाची वाहातुकिला अड़चन होवू नये या साठी व्यवस्तीत लावण्या साठी पोलिस कर्मचारी तैनात केल्याचे दिसुन येत आहे

नागरिकानी संयम बाऴगावा इतराला त्रास होईल असे कृत्ये करुन समाजात अशांतता पसरु नये असेही पोलिस विभागाच्या वतीने कटाक्ष पाऴले जात आहेत

मोफत चष्मे वाटप!

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

सामाजिक बांधिलकी आणि सम ाजसेवेचे व्रत जपणाऱ्या रोटरी क्लब ऑफ नांदेड आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हिजन फॉर ऑल' (तळीळेप र्ह्रे श्रश्र) या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. हा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासदगाव आणि नांदुसा येथे उत्साहात पार पडला.

शालेय वयात विद्यार्थ्यांच्या दृष्टीदोषाचा त्यांच्या अभ्यासावर आणि प्रगतीवर परिणाम होऊ नये, या उद्देशाने 'व्हिजन फॉर ऑल' प्रोजेक्ट अंतर्गत ही तपासणी व वाटप मोहीम राबवण्यात आली होती. या मोहिमेत दोन्ही शाळांतील दृष्टिदोष आढळलेल्या ८ विद्यार्थ्यांना चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. अंबुलगेकर, रो. डॉ. मालू, रो. काला, रो. मामीडवार आणि रो. कामाटलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी खा. डॉ. अजित गोपछडेंचे एका महिन्याचे वेतन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना हातभार लागावा, या उद्देशाने राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी आपल्या एका महिन्याचे वेतन, २ लाख २६ हजार ७८७ रुपये, मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिले. १७ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी या रकमेचा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांसह कृती आराखड्याबाबत म ार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याबरोबरच पाणीटंचाई, शेती आणि ग्राम ीण अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याच्या गरजेवरही चर्चा झाली.

दुष्काळाच्या काळात पशुधनाचे संरक्षण आणि चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासनाने वैरण विकास धोरणाला मंजुरी दिली आहे. या धोरणांतर्गत चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, गायरान व शासकीय पडीक जमिनींचा नियोजनबद्ध वापर करणे आणि चाऱ्याची योग्य साठवणूक करण्यासारख्या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच पशुधन आणि शेतीच्या गरजांचा विचार करून पाणीवाटपाचे नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.

दरम्यान, खासदार डॉ. अजित गोपछडे गेल्या काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यातील विविध गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. दुष्काळामुळे शेतीसमोर निर्माण झालेल्या अडचणी, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता याबाबत ते शेतकऱ्यांकडून माहिती घेत आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या संबंधित स्तरावर मांडून त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि पशुपालकांना आधार देणे, पशुधनाचे संरक्षण करणे तसेच तातडीच्या मदतीसोबतच दुष्काळावर दीर्घकालीन उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. गोपछडे यांनी आपल्या एका महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देऊन दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना हातभार लावला आहे.

राज्यस्तरीय पुरस्काराने भोकरचे किशनसिंह चौहान सन्मानित

भोकर-जवळपास मागील ४0वर्षापासून बाराही महिने ऊन ,पाऊस आणि थंडीची तमा न बाळगता दररोज पहाटे वृत्तपत्र विक्रेत्याच्या

माध्यमातून सेवा करणारे भोकर येथील किशनसिंह शंकरसिंह चौहान यांना वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधून १५ ऑक्टोबर रोजी नांदेड येथील कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उत्कृष्ट वृत्तपत्र विक्रेता म्हणून राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. नांदेड जिल्हा वृत्तपत्र विकास मंडळाकडून आयोजित या कार्यक्रमात आ.बालाजी कल्याणकर ,आ. अमर राजूरकर, प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, पुढारीचे आवृत्तीप्रमुख संजीव कुलकर्णी, मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनाचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत किशनसिंह चौहान यांना शाल,श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल किशोरसिंह चौहान यांचे पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील अनेकजण, वृत्तपत्र विक्रेता आणि अनेक वाचकांनी अभिनंदन केले आहे.

प्रा. शा. शेंबोली येथे विद्यार्थ्यांना सायबर क्राइम व सायबर सुरक्षिततेचे धडे

नांदेड -येथील प्राथमिक शाळा शेंबोली (ता. मुदखेड) येथे विद्यार्थ्यांम ध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि इंटरनेटचा सुरक्षित वापर करण्याची सवय लागावी, या उद्देशाने बारड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सायबर क्राईम व सायबर जागरुकता याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मोबाईलचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावरील धोके, अनोळखी व्यक्तींकडून येणारे फोन व संदेश, ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, पासवर्डची सुरक्षितता तसेच वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

लोकशाहीच्या समृध्दीसाठी वाचन अनिवार्य: एन. जी. वाघमोडे

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

नवीन नांदेड भागातील वसरणी येथे प्रज्ञा ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन साजरा झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक एन. जी. वाघमोडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश कदम हे होते.

यावेळी यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना कदम यांनी डॉ. अब्दुल कलाम ांच्या प्रेरणादायी जीवनाचा श्रोत्यांपुढे आलेखच उभा केला. डॉ. कलामांच्या स्वप्नातील भारत उभा करावयाचा असेल तर आपण सर्वांनी वाचन संस्कृतीकडे वळले पाहिजे. कारण वाचन हे माणसास विचार करण्यासाठी उद्युक्त करते, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना वाघमोडे म्हणाले, आपली लोकशाही समृद्ध नि बळकट व्हाकी असे वाटत असेल तर आपण वाचन संस्कृती अंगीकारली पाहिजे. आणि त्यासाठी ग्रंथालयाची आवश्यकता आहे. ग्रंथालये सशक्त आली पाहिजेत.

कार्यक्रमाच्या आरंभी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सुदर्शन गजभारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय भानुदास पोवळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचलन महेश गजभारे यांनी केले.

या कार्यक्रमास सी. आर. पंडित, भगवानराव काळे, हरी गजभारे, रामचंद्र पांचाळ, कुलदीप नंदूरकर, अशोक गजभारे, प्रांजल पोवळे, पांडू वाघमारे, प्रा. नामदेव वाघमारे, भगवान बाभळे, संदीप सूर्यवंशी, डॉ. एल.एस. अय्या आदी श्रोते उपस्थित होते. शासनाने वैरण विकास धोरणाला मंजुरी दिली आहे. या धोरणांतर्गत चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, गायरान व शासकीय पडीक जमिनींचा नियोजनबद्ध वापर करणे आणि चाऱ्याची योग्य साठवणूक करण्यासारख्या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच पशुधन आणि शेतीच्या गरजांचा विचार करून पाणीवाटपाचे नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.

दरम्यान, खासदार डॉ. अजित गोपछडे गेल्या काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यातील विविध गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. दुष्काळामुळे शेतीसमोर निर्माण झालेल्या अडचणी, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता याबाबत ते शेतकऱ्यांकडून माहिती घेत आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या संबंधित स्तरावर मांडून त्यांना आवश्यक मदत मि ळवून देण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि पशुपालकांना आधार देणे, पशुधनाचे संरक्षण करणे तसेच तातडीच्या मदतीसोबतच दुष्काळावर दीर्घकालीन उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. गोपछडे यांनी आपल्या एका महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देऊन दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना हातभार लावला आहे.

पत्रकार धम्मदाता कांबळे यांना मातृशोक*

मुदखेड-मुदखेड येथील पत्रकार धम्मदाता कांबळे यांच्या मोतोश्री भिमनगर येथिल जेष्ट महिला का. कमलबाई भीम राव कांबळे यांचे शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०:०० वाजताच्या सुमारास आकस्मिक निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ६० वर्ष होते. त्यांच्या पार्थिवदेहावर रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३:५० वाजता मुदखेड येथील बौद्ध स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, नातवंड, असा मोठा परिवार आहे. सचिन भीमराव कांबळे, सुमेध भीमराव कांबळे, पत्रकार धम्मदाता भीमराव कांबळे यांच्या त्या आई होत.

मारोती पाईकराव यांचे निधन

नांदेड-मारोती तुकाराम पाईकराव (वय ८१, रा. चक्री ता. हदगाव) यांचे १८ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चक्री येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, बहीण, दोन मुल, दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे. ते धम्मपाल व प्रवीण पाईकराव यांचे वडील तर पत्रकार अविनाश पाईकराव यांचे चुलते होते.

गुणपत्रक हरवले

माझी श्रुती सूर्यकांत पवार या नावाची इयत्ता १० वी चे गुणपत्रक व १२ वी विज्ञान चे गुणपत्रक नांदेड ते सोनखेड या मार्गावर बस ने प्रवास करीत असताना हरवली आहे तरी कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा :- सूर्यकांत त्र्यंबकराव पवार
मु. पारडी पोस्ट लोहा जिल्हा नांदेड
मोबाईल नंबर : ९७६३०८४१३०

दु:खाच्या सावलीत स्नेहबंधाचा आधार खासदार रविंद्र चव्हाण यांची वाघमारे कुटुंबीयांना सांत्वनपर भेट

तभा वृतसेवा
नायगाव, दि. १७ ऑक्टोबर -

नात्यांमधील जिव्हाळा, माणुसकीची ओल आणि दु:खाच्या प्रसंगी धीर देणारी आपुलकी यांचा प्रत्यय नरसी येथे आला. नरसी येथील दिलीप वाघमारे यांच्या मातोश्री पार्वतीबाई माधवराव वाघमारे यांचे गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. या दुःखद घटनेची माहिती मिळाल्यानंतर खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांनी रविवारी वाघमारे कुटुंबीयांच्या निवासस्थानी भेट देऊन शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी आस्थेने संवाद साधत या कठीण प्रसंगी त्यांना धीर दिला. त्यांच्या या भेटीमुळे वाघमारे कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत माणुसकीच्या नात्यांची जपणूक करण्याचा भावपूर्ण प्रत्यय उपस्थितांना आला.

स्व. पार्वतीबाई वाघमारे यांना दि. २६ सप्टेंबर रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. दि. १० ऑक्टोबर रोजी नरसी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने वाघमारे कुटुंबीयांवर दुः

खाचा डोंगर कोसळला असून, या दुःखद प्रसंगी खासदार चव्हाण यांनी दिलेली भेट कुटुंबीयांना आधार देणारी ठरली.

या सांत्वनपर भेटीला जुन्या आठवणींचाही भावनिक पदर लाभला. दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्याशी गेल्या चार दशकांपासून जिव्हाळ्याचे संबंध जपणारे जुने कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांनी त्यांच्याशी संवाद साधताना स्व. वसंतराव चव्हाण यांच्यासोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. दीर्घकाळ जपलेले स्नेहबंध, परस्परांवरील विश्वास आणि राजकीय-सामाजिक वाटचालीतील अनुभव यांची उजळणी होताच उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. दुःखाच्या प्रसंगी सांत्वनासाठी आलेली ही भेट जुन्या ऋणानुबंधांना पुन्हा उजाळा देणारी ठरली.

यावेळी भास्कर पाटील जिगळेकर, प्रमोद वाघमारे (कॉन्ट्रॅक्टर), शेख बाबूभाई, कुंचेलीकर पटेल, माधव डोनगावे मुगांवकर, मधुकर ताटे, लालबा सूर्यवंशी, अनिल कांबळे, शेख जब्बार, भीमराव भवरे, अनिल पवळे, सहाय्यक पीए, श्रीनिवास सोमनकर, राजू वाघमारे, विठ्ठल भेदे, राजू कामघंटे, शुभम पांचाळ, संजोक मुसळे, नागेश भेदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

किनवट ते माहूर दत्तशिखर व रेणुका माता पदयात्रा २७ ऑक्टोबरला

तभा वृतसेवा
किनवट, दि. १७ ऑक्टोबर -

देव, देश आणि धर्माविषयी जनजागृती, तरुणांमध्ये व्यसनम ुक्तीचा संदेश आणि हिंदुत्वाची अखंड ज्योत तेवत ठेवण्याच्या उद्देशाने किनवट ते माहूर दत्तशिखर व रेणुका माता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ५ वाजता श्री संत गजानन महाराज मंदिर, किनवट येथून पदयात्रेला प्रारंभ होणार आहे. वेदमूर्ती ह.भ.प. दिनेश महाराज कुलकर्णी (छत्रपती संभाजीनगरकर) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या पदयात्रेचे हे सहावे वर्ष आहे. श्रीराम पदयात्रा समितीचे अध्यक्ष ड. दिलीप काळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या पदयात्रेतून भाविकांना माहूर येथील श्री दत्तशिखर व रेणुका माता दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. या धार्मिक उपक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीराम पदयात्रा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. पदयात्रेसाठी आयोजकांनी दिलेल्या क्यूआर कोडद्वारे नोंदणी करता येणार असून, प्रत्यक्ष सहभागी होणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी ऑनलाइन सहभागाची सुविधाही उपलब्ध आहे. पदयात्रेनंतर किनवटला परतण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत असून, समितीचे संयोजक ॲड. प्रतीक केराम यांनीही भाविकांना पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

नगरपरिषद उर्दू शाळेचा चेहरा मोहरा बदलणार : नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी

तभा वृतसेवा
बिलोली, दि. १७ ऑक्टोबर -

बिलोली नगर परिषदेच्या माध्यमातून १९७५ साली स्थापना झालेल्या या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी व पहिली ते सातवी उर्दू तथा मराठी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत शाळा फक्त पुस्तकी ज्ञान देणारी जागा न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र बनावे यासाठी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या नेतृत्वात नगर परिषदेने कंबर कसली आहे. शाळेचा जीर्ण झालेल्या इमारतीत जीव ओतण्यासाठी पायाभूत सुविधा व भौतिक बदल होणार आहे. यात आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालून सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा शाळेचे बळकटीकरण आधुनिक संगणक लॅब आधी सुविधा होणार आहेत. या माध्यम ातूनच पालक शिक्षक शैक्षणिक दर्जा आणि भाषा कौशल्य यांचा मेळ घालून विद्यार्थ्यांवर संस्कार होणार आहेत उर्दू भाषेचा अभिमान बाळतानाच इंग्रजी आणि मराठी स्थानिक भाषा या भाषेवर विद्यार्थ्यांचे प्रभुत्व निर्माण करण्यासाठी विशेष मोहीम हातात घेण्यात येणार आहे. शिक्षणाबरोबर संस्कृती व क्रीडा सुविधाही देण्यात येणार आहेत स्वच्छता व आरोग्याच्या बाबतीतही मुला मुलींसाठी स्वच्छ शौचालय आणि पिण्याच्या शुद्ध पाण्याची आरो व्यवस्था करण्यात

येणार आहे शाळेच्या बाह्य आणि अंतर्गत आधुनिक बदल घडवून आणण्यासाठी जी मोहीम राबवण्यात येणार आहे त्याबद्दल सर्व नगरसेवकांनी सहमती दर्शवली असून बहुम ताने ठराव पारित केल्याबद्दल शहरातील सुज्ञ नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर कायदेशीर बाबींची पूर्तता करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे या अभूतपूर्व कायापलटामुळे इंग्रजी माध्यम ांकडे वळलेला पालकांचा कल पुन्हा नगरपरिषदेच्या शाळेकडे झुकेल असा विश्वास नगरसेवक अब्दुल फिरदोस, वसीम बेग इनामदार यांनी व्यक्त केला.

शिक्षणाचा दर्जाही बदलणार -अनुप अंकुशकर

आम्ही केवळ इमारतीचा रंग बदलणार नसून शिक्षणाचा दर्जाही बदलणार आहोत या शाळेला नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या नेतृत्वात स्वतंत्रभारताचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नाव देण्यात येणार असल्याचे उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी सांगीतले.